# * प्रकरण तिसरे *

## * उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतील आशयसूत्रे, व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण, भाषाशैली व लेखनशैलीची वैशिष्ट्ये *

✳ प्रकरण तिसरे ✳

# ✳ उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतील आशयसूत्रे, व्यक्तिचित्रण,प्रसंगचित्रण, भाषाशैली व लेखनशैलीची वैशिष्ट्ये ✳

**प्रास्ताविक :-**

कोणत्याही लेखन कृतीत लेखक आपला जीवनविषयक दृष्टिकोन मांडत असतो. आपल्या कथालेखनात किंवा आपल्या कथेच्या कथानकात वास्तव जीवनाचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न लेखक करतच असतो. त्यामुळे कथेत नकळत वाचकाला वास्तवतेची अनुभूती देण्याची शक्ती आलेली असते. कथेत अशी वास्तवता येण्यासाठी कथेच्या विषयाबरोबरच कथेचे आशयसूत्र महत्त्वाचे असते. हे आशयसूत्र जीवनविषयक दृष्टिकोनातून साकार झालेले असते. कादंबरीसारख्या वाङमय प्रकारात विषयाच्या आणि आशयसूत्राच्या विस्ताराला अधिक अवकाश असतो. पण कथेत मात्र तो कमी असल्यामुळे आशय सूत्रांची विविधता आणि विषयाची सखोलता कादंबरीप्रमाणे येऊ शकत नाही. कादंबरी आणि कथेची ही तुलना लक्षात घेऊन उत्तम बंडू तुपे यांच्या कथातील विषयांची विविधता, आशयसूत्रे, त्यांनी केलेले व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण, आणि भाषाशैली व लेखनशैलीची वैशिष्टये यांचा विचार प्रस्तुत प्रकरणात विस्ताराने केलेला आहे.

**१) आशयसूत्रे :-**

कोणत्याही साहित्य कृतीत लेखकाची जीवनदृष्टी महत्त्वाची असते. या बाबतीत डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की "जीवन दृष्टीच्या व्यापकतेवर, सखोलपणावर आणि मौलिकतेवर लेखकाची महत्ता अवलंबून असते."[१]

लेखकाची जीवनदृष्टी समृद्ध बनविण्यासाठी तो मानवी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करत असतो. 'उत्तम बंडू तुपे' यांना जीवनात आलेले अनुभव त्यांची जीवनदृष्टी समृद्ध करण्यासाठी

निश्चित उपयुक्त ठरलेले आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणात आपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा विचार यासाठीच केलेला आहे. लेखकाची जन्मजात प्रतिमा आणि जीवनात आलेले अनुभव यामुळे तुपे यांची जीवनदृष्टी समृध्द बनलेली आहे. 'आदंण' आणि 'कोंबारा'या तुपे यांच्या कथासंग्रहातून आलेली आशयसूत्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) शेतीतील नव्या जाणिवांचे चित्रण कथा :-

**'आंदण' (आंदण)**

ही कथा बाबल्या शेतकऱ्याचे चित्रण करणारी कथा आहे. स्वाभिमानी, जिद्दी आणि श्रद्धाळू बाबल्या आपली शेती ओलिताखाली यावी म्हणून स्वतःच्या जमिनीत विहीर काढतो. विहीर काढत असताना त्याच्या झालेल्या स्थिती-गतीचे दर्शन या कथेमधून उत्तम तुपे यांनी घडविले आहे.

आपली मुरमाड शेती आणि त्यामध्ये राबणारा कष्टकरी शेतकरी स्वतःच्या जीवापेक्षा काळया आईवर जीव लावतो. दुसऱ्याकडून पाणी घेऊन आपल्याला जगता येणार नाही याची त्याला जाणीव होते. दुसऱ्याची हिरवीगार पिके पाहून बाबल्याच्या मनातील विहीर खुदाईचा विचार उचल खातो. जिल्हापरिषदेकडून राबविलेल्या योजनेतून त्याचे तगई प्रकरण मंजूर होते. पण प्रकरण मंजूर करण्यासाठी तलाटयापासून वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत बाबल्याला सर्वांचे हात ओले करावे लागतात. मंजूर झालेले पैसे विहिरीचे अर्ध्यावर काम आले असता संपतात. म्हणून घरातील शिल्लक पैसे घातले जातात पण विहिरीचे काम पूर्ण होत नाही. म्हणून जीवापाड प्रेम करणाऱ्या, आईच्या माहेराकडून मिळालेली गाय विकतो व विहिरीचे काम पूर्ण करतो. शेवटचा सुरुंग पेटताच विहिरीला पाणी लागते. बाबल्या आनंदी होतो. त्याच्या जीवनातील तो आनंदाचा क्षण असतो.

उदा. -"काय रं बाबल्या का पळतू?

'पाणी लागलं. 'बाळीचं' रूपच यश घेऊन आलं.

घरी आल्या आल्या त्याने आईला मिठी मारली.

'आये, तुझं आंदण यशवंत झालं. पाण्याच्या रुपानं ते हिरीत आलय?

'खरं म्हणतू !'

'तर काय ! नव कापड दे''[१]

कथेमधून पाण्यासाठी बाबल्या शेतकरी धडपड करतो. पाणी लागताच दुसऱ्या शेतकऱ्याला विकलेली गाय तो परत आपल्या गोटयात आणतो. आईला माहेराकडून मिळालेले आंदण त्याच्या उपयोगी पडते. कथेला दिलेले 'आंदण' हे शीर्षक यथार्थ वाटते.

**'कोंबारा' (कोंबारा)**

कोंबारा कथेमधून कृषी क्षेत्रातील हा बदल नोंदविण्याचा प्रयत्न उत्तम बंडू तुपे यांनी या कथेत केला आहे.

कथेच्या सुरवातीच्या वातावरण निर्मितीमधून 'बबन' नावाच्या पारंपरिक शेती करणाऱ्या अशिक्षित, गरीब शेतकऱ्याचे चित्रण केले आहे. 'बबन्या' कडे भरपूर शेती असूनही ती शेती पिकविण्याचे पुरेसे ज्ञान नसल्याने 'काळजागत वावरं' गावच्या गुरांना कुरण म्हणूनच वापरात होती. परिस्थितीने अगतिक झालेला बबल्या काहीही करू शकत नाही.

'सीताराम' बी.एस्सी. ॲग्री होऊन आपल्या गावी येतो. मुलगा शिक्षण घेऊन आल्यानंतर काय करील अशा प्रकारचा गोंधळ बबन्याच्या मनात निर्माण होतो. पण प्रत्यक्ष ही घटनाच बबन्याच्या आयुष्याला कोंबारा फोडणारी ठरते.

सीतारामने शिक्षणाचा उपयोग नोकरीपेक्षा आपली शेती आधुनिक तंत्राने केली हा प्रसंग सध्याच्या व्यवसायभिमुखतेला साद घालणारा ठरतो. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर विकासासाठी करून घेण्याची एक दिशा कोंबारा कथेचा नायक गावकऱ्यांना देतो. उघडया मुरमाड माळरानावर सीतारामने फुलविलेले कोंबारे हे प्रत्येक सुशिक्षित तरुणाला कृतिशील शिक्षणाच्या पाऊलवाटा चोखाळावयास लावणाऱ्या दिशादर्शक आहेत, याची जाणीव कथा वाचताना होते. त्यामुळे कथेचे शीर्षक यथार्थ असल्याची जाणीव होते.

**'पैक्याची झाडं' (आंदण)**

या कथेमधून सोमा पवार या शेतकऱ्याचे प्रभावी चित्रण आले आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीनुसार खेडयातही बदल झालेत. त्यामुळे पारंपरिक तंत्राने शेती न करता, पारंपरिक पिके न घेता, नगदी पिके घेण्याच्या मागे शेतकरी धावत असल्याचे जाणवते. कमी कष्टात जास्त फायदा या तत्वानुसार शेतकरी वागू लागला. विहिरीवरील मोट जाऊन त्याची जागा विद्युत मोटरने घेतली. बैलजोडीपेक्षा ट्रॅक्टरने केलेली शेती विनात्रासाची होते, अशी या कथेच्या नायकाची धारणा होती. त्यामुळे बैलजोडी पाळण्यापेक्षा एक ट्रॅक्टर बरा म्हणून तो बैलजोडी विकतो याचे दुःख मालकापेक्षा गोपाला (सालगडयाला) होते. गोपाचे न ऐकता आपल्या शेतात नगदी पिके घेण्याचा प्रयत्न कथेचा नायक सोमा पवार करतो. ऊस, पलाटी, द्राक्षबाग, लिंबूबाग यातून मिळणारे उत्पन्न व त्यावर झालेला खर्च याचा ताळेबंद बसत नाही. बँकाकडून घेतलेले कर्ज वाढते. गरजेची पिके न घेतल्याने शेतकऱ्याची उपासमार होते. त्यामुळे कर्जबाजारी झालेला सोमा म्हणतो, " हे काय खरं नाय, रोजच्या गर्जची पिकं घेतल्याबगार आता निभाव लागणार न्हाय. धान्याची पिकं पिकवल्याबगार जगता भी येणार न्हाय. जगायच असल तर पोटाला भरपूर अन्न पाहिजे. साखर कांदा, कापूस खाऊन कुणाला जगता येणार न्हाय."[३]

काळानुसार शेतकरी बदलण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचा तोटा अधिक होतो.

13763
A
UNIVERSITY

याचे चित्रण उत्तम बंडू तुपेंनी प्रभावीपणे केले आहे. कथेचे शीर्षक यथार्थ वाटते.

**'खुळंबा' (आंदण)**

ही कथा 'राजा' शेतकऱ्याच्या जीवाची तगमग व्यक्त करणारी आहे. मोटेच्या जागी विद्युत मोटार आली आणि ती सतत खुळंबा करू लागली. मोट होती तेव्हा शेतकऱ्याला लाईटची वाट पाहत बसावे लागत नव्हते. विद्युत मोटरचा महिन्यातून दोनवेळा होणारा खुळंबा त्यामुळे शेतीतील पिके वाळून जाऊ लागली. प्रसंगी शेतकरी हवालदिल होऊ लागला.

परत परत बिघडणारी मोटार, त्यावर होणारा खर्च, शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरचा होता. गेलेली लाईट परत येईपर्यंत वाट पहाण्याव्यतिरिक्त शेतकरी काही करू शकत नव्हता. खुळंबा झाला नसता तर आपण शेतीला मुबलक पाणी देऊ शकलो असतो अशा विचारातून शेतकरी मोट व इंजिन होती तेव्हा आपण कशा पध्दतीने पाणी दिले होते याची आठवण होते.

''असल्या चांदण्यात भिजत-भिजत लई पिकं भिजवली. कटाळा येऊस्तवर हातपाय चिखलात मळून घेतलं. मोटच्या लावण्या गळयातनं अलगुज काढून वाजवल्यागत गळा काढून बैलं भुलवली. रातध्याड इंजन चालवल. कवा शिणलो-भागलो नाही, जीव सुखी झाला! तेलाचा खर्च भागना तवा इंजन गेल नी ही मोटार आली. महिन्यातन दोन वक्ताला हिला रोगडा यितोय.''[४]

महिन्यातून दोन वेळा होणारा खुळंबा, वाळून जाणारी पिके त्यामुळे शेतकरी त्रागा करतो. पण त्याची तक्रार करण्याची तयारी नाही. परिस्थितीने गांजलेल्या अशा शेतकऱ्याचे चित्रण या कथेचा आशय आहे. कथेला दिलेले शीर्षक, योग्य वाटते.

**'पाड' (कोंबारा)**

निसर्ग आणि मानवी जीवन यांच्या परस्पर सान्निध्याचे चित्रण करणारी ही कथा पण

लेखकांच्या समर्थ लेखणीने आंब्याच्या प्रतिकात्मक रूपात मानवी जीवनाचे रेखाटन केले आहे.

कुशाबा शेतकरी अनेक उन्हाळे-पावसाळे डोक्यावर झेलून जगलेला साधाभोळा माणूस वाटतो. स्वतःच्या ऐन उमेदीच्या काळात जेवढे करता येईल तेवढे स्वतःसाठी आणि दुसऱ्यासाठी करत आला आहे. शरीर साथ देत नाही पण काम सोडायचे त्याला अवघड वाटते. मुलं मोठी होऊन कमवायला मुंबईला गेली. अशा एका निष्ठावान शेतकऱ्याच्या मनाचा कोंडमारा कथेच्या पानापानांतून व्यक्त झाला आहे.

शरीर कष्टाची कामे करण्यासाठी साथ देत नाही. पण रानात आंब्याचा पाड लागलाय म्हटल्यावर घरात बसून राहणे त्याच्यातल्या शेतकऱ्याला जमत नाही. म्हणून उन्हातान्हातून वावराची वाट धरतो ही त्याची आंतरऊर्मी आहे. मनाचा हिरवेपणा आहे. म्हणून तर जाता जाता तो धुरपाला म्हणतो, ''न्हायतर चल तू बी, जाऊया जोडीनं''

कोंबारा कथेतील बदलत्या कृषी जीवनाचे चित्रण रेखाटताना लेखक चांगला बदल सुचवू इच्छितात मात्र पाड कथेतील चित्रण कुशाबाच्या आणि लेखकांच्या मनाला बोचणी लावणारे आहे.

वाळलेल्या झाडागत वाटणारा कुशाबा कधी काळी पाडाच्या आंब्यासारखा होता. आपल्या आणि गावाच्या लौकिकात भर घालणारा पैलवान कुशाबा डोईफोडे याला आपल्याच तरूणपणाची चित्तरकथा आठवून वठलेल्या झाडालाही थोडीशी पालवी फुटल्याचा भास होतो आणि वयात आल्यावर मुंबईच्या वाटेला लागणाऱ्या आजच्या तरुणपिढीबद्दल खंतही लेखक कुशाबाच्या तोंडून व्यक्त करतात.

येणाऱ्या-जाणाऱ्यांशी आपलेपणाने बोलणाऱ्या कुशाबाच्या जगण्यातला परोपकार वारंवार जाणवतो. कुरवडया घालणाऱ्या स्त्रियांना बोटवं घालायला सांगून त्यासाठी आपल्या

आंब्यावरचं आंबे देण्याचे कबुल करणारा कुशाबा परोपकारी वाटतो.

हृदयातील रक्त पाजून मोठी केलेल्या आंब्यांच्या झाडांनी कुशाबाला खूप दिले आहे. आज कुशाबाही या आंब्याप्रमाणेच सर्वांना खूप देऊन पुरला आहे.

पाड उतरल्यावर झाडानां आलेली अवकळा आणि उतारवयाचा कुशाबा दोघेही एकमेकांचे प्रतिबिंब स्पष्ट करतात. वादळवाऱ्यानी उन्मळून पडणाऱ्या आंब्याच्या झाडाप्रमाणे इतरांसाठी झटता झटता कुशाबाही या मातीत मिसळून जाईल. अशा प्रकारचा या कथेचा शेवट चुटपूट लावणारा वाटतो.

'वैशाखी वारं' (कोंबारा)

या कथेमधून शेतकरी जीवनाचे चित्रण आले आहे. शेतीतील अनुभव मांडताना उत्तम बंडू तुपे यांच्या कथाकृती साध्या, सरळ वाटतात. वैशाख महिन्यातील उन्हाने शेतकऱ्यांची पिके वाळून जातात. बळीराजा पाऊस पडण्याची वाट पाहतो. त्याच्या विहिरीचे पाणी कमी होत आलेले असते. शेतकरी अनंता काळजीत असतो. कारण त्याच्या शेतीतील पिकांना पाणी पाजण्याची गरज असते. संकटात भर म्हणून मोठे वादळ होते. विद्युत मोटरचे पोल उन्मळून पडतात. अचानक आलेल्या संकटाने शेतकरी गोंधळून जातो. वायरमेन उन्मळून पडलेले पोल कधी उभा करतील याची तो वाट पाहतो. तो काम संथ गतीने चालल्याने सतत वायरमेनना तो विचारत असतो.

" 'वायरमन! हे खांब कवा उभं करता.
लाईट कवा चालू हुणार गा.'
'हुतिय गा दोन रोजात'
'आता पाच साल मस कमीवलं की, एकाद वरीस बांडा गेलं तर काय हुतयं'
'काय कमिवलं न्हाय वायरमन. तुमचं इजचं बिल टिपिऱ्यात डोळं पाढरं करायला

लावतय'

'मग हिरीवर मोट धरा की. वाडवडलांची चालरीत चालवा. तुमाला कुणी जोरा केलाय काय. हिरीवर मोटरपंप बसवा म्हणून.''[५]

कथेतील ही घटना विद्युत मंडळाच्या कारभारावर टीका करणारी वाटते. गरीब शेतकऱ्यांची वायरमेन कशा प्रकारे अडवणूक करतात याची जाणीव होते. तसेच लाईट बिल भरत असताना शेतकऱ्यांना कसा त्रास होतो याचे चित्रण लेखकांनी या कथेमधून केले आहे.

**'रानबा' (कोंबारा)**

जुन्या बुरसटलेल्या विचारांचा वारसा जपून स्वतःच्या संसाराचा गाडा चालवू पाहणाऱ्या उर्मट विचारावर भाबड्या प्रेमानं केलेली मात म्हणजेच 'रानबा' ही कथा होय.

कथेचा नायक 'रानबा' सरळ, साधा, भाबडया आणि हळव्या मनाचा शेतकरी आहे. लग्नानंतर पत्नीशी एकनिष्ठ राहणारा रानबा वडिलांच्या विचाराचा बळी ठरतो.

चार मुलांच्या लग्नात भरपूर हुंडा घेऊन मोठेपणा मिरविणारा, स्वतःच्या मुलीच्या लग्नात हुंडा देताना अखडता हात घेतो. शेतकरी कुटुंबातील मुलगा व वडील यांच्यामधील भावनिक संघर्ष या कथेमध्ये टोकाला गेला आहे.

आपल्या काळयासावळया बायकोवर मनापासून प्रेम करणारा रानबा बायको माहेरी जाण्याने सैरभैर होतो. हळव्या मनाने गोठयातील गाई-गुरांशी बोलू लागतो. रानातील कामे करता करता, संभ्या कुत्र्याशी गप्पा मारता मारता 'सुमनच्या आठवणी चाळविण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या जीवनातील हा प्रसंग हृदय हेलावून सोडणारा आहे. सगळयांच्यामध्ये असूनही कुणाच्यातच नसलेला रानबा आपल्या गावरान भाषेत सौंदर्याची व्याख्या सांगून जातो.

''सुमन रंगानं काळी हाय, पर मनानं देखणी हाय. पाण्यागत मन हाय बघ तिचं''[६]

रंगापेक्षा गुणाची पारख करणारा रानबा वाचकाची नकळत सहानुभूती मिळवितो. पैशाच्या मोहाने दिशाहीन झालेल्या समाजातील विकृत मनोवृत्तीच्या विरोधात, साध्या सरळ मनाच्या भाबडया प्रेमाने अखेर बंड उभारले. हळव्या मनाचा रानबा अखेर या वृत्तीविरोधात पेटून उठला आणि सुमनच्या प्रेमापोटी डांबवाडीची वाट धरली.

सबंध कथेत सुमनच्या प्रेमाने विव्हल झालेला रानबा चित्रित करताना कथेच्या शेवटच्या चार ओळीतून रानबाच्या विरहाने व्याकूळ झालेली 'हरिणी' – सुमन कथेचा तोल सावरून जाते. दोन हळव्या मनाचे मिलन जगाच्या बऱ्या-वाईटाची पर्वा करत नाही. खऱ्या प्रेमापुढे सत्ता, संपत्ती तुच्छ मानणाऱ्या विचारांचा विजय वाचकाच्या मनाला भावतो हे या कथेचे यश होय.

**मळणी (कोंबारा)**

मळणी कथेमधून ग्रामीण भागातील बदलाबरोबरच आधुनिक तंत्राने आपली शेती शेतकरी कशा प्रकारे करू लागला याचे चित्रण उत्तम बंडू तुपे यांनी केले आहे.

त्याबरोबरच दोन शेतकऱ्यामधील स्पर्धा, हॉलरने मळणी करत असताना कोणत्या प्रकारची वाटचाल करते हे लेखकांनी प्रभावीपणे मांडले आहे. तुपे यांच्या कथात भाबडा आशावाद नाही. आणि आक्रस्ताळा सूरही नाही. भोवतीच्या परिसरातून वेचलेली कथाबीजं फुलवताना त्यांची निरीक्षण शक्ती प्रभावी वाटते. अशा प्रकारे उत्तम बंडू तुपे यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील नव्या जाणिवांचा आढावा घेतला आहे. खेड्यातील जीवन जगलेल्या लेखकाने त्याची अकृत्रिम अस्सल अभिव्यक्ती या कथातून घडवलीय. विज्ञान कितीही प्रगती करो, इतरत्र काहीही घडो, या ग्रामीण जीवनाचे साचलेपण, त्याची कोंडी, त्यांच्या समस्या आहेत तशाच असल्याची जाणिव कथा अभ्यासत असताना होते.

**२) भटक्या जमातीची चित्रण कथा :-**

'आंदण' आणि 'कोंबारा' या कथासंग्रहांमधून भटक्या जमातीचे यथार्थ चित्रण करणाऱ्या कथा आलेल्या आहेत.

**'वझ्याखालचं वझं' (आंदण)**

या कथेमधून कैकाडी जमातीचे चित्रण आले आहे. कैकाडी जमातीमधील 'उमाजी', 'नरावण' गावच्या 'भिका सरपंचाच्या मळयात ताली टाकण्याचे काम करतो. पण त्याला त्याच्या कष्टाचा मोबदला दिला जात नाही. भिका सरपंच गावची जमीन हडप करतो हे जेव्हा गावकऱ्यांना समजते तेव्हा त्याच्यावर सर्व गावकरी बहिष्कार टाकतात. त्यामध्ये उन्हाळ-पावसाळी कामे करणाऱ्या उमाजीवर उपासमारीचा प्रसंग ओढवतो. त्यातूनही आपल्या कष्टाची कमाई मागण्यासाठी तो जेव्हा सरपंचाच्या दारात जातो तेव्हा त्याला थोडे धान्य देऊन पाठविले जाते व आपल्या शेताच्या ताली टाकून बांध करण्यासाठी त्याच्यावर सरपंच बळजबरी करतात. उमाजी त्यांना विरोध करतो, पण त्याच्या विरोधाला न जुमानता सरपंच मारझोडीच्या भाषेचा वापर करतात.

आपण जसे विनामोबदला राबलो तसा प्रसंग आपल्या मुलांवर येऊ नये म्हणून आपल्या मुलांना शिक्षण देणारा उमाजी या कथेमधून उत्तम तुपेनी प्रभावीपणे उभा केला आहे.

अशी ही भटकी जमात काबाडकष्ट करून आपली उपजीविका करते, पण या जमातीवर कशा प्रकारचा अन्याय श्रीमंत व्यक्ती करते याचे चित्रण करून, कैकाडी जमातीच्या कष्टाळू प्रवृत्तीवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.

**'गुबूगुबू' (आंदण)**

या कथेमधून नंदीवाल्या भटक्या जमातीचे चित्रण येते. या जमातीमधील अज्ञान,

अंधश्रध्दा, अमानुष प्रथा एखाद्या प्रसंगी कोणते भीषण रूप धारण करते ते सतत जाणवत राहते.

चंदण्या 'नंदीवाला', 'राजगीरे'चा पत्नी म्हणून स्वीकार करू शकत नाही. त्यामुळे आपल्या जमातीमध्ये झालेल्या मानहानीचा वचपा काढण्याचा ती प्रयत्न करते. त्याला पाहून ती सतत शिव्या देत असते. पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. रात्रीच्यावेळी चंदण्याच्या नंदीला विषप्रयोग केल्याने त्यामध्ये नंदीचा मृत्यू होतो. आपल्या नंदीचा राजगीरेने मृत्यू घडवून आणल्याची कल्पना चंदण्याला आल्याने तो माळ सोडून जातो. आपण ज्या प्रकारचे जीवन जगलो तसे निरस जीवन आपल्या कुटुंबातील मुलांच्या वाटयाला येऊ नये; आपली मुले शिक्षणाने संस्कारित व्हावीत, यासाठी चंदण्या प्रयत्न करत असल्याचे जाणवते. नंदीबैलाचा पारंपरिक व्यवसाय सोडून आपल्या सावत्र भावाला वेगळ्या, सुरक्षित जगात नेऊ पाहणारा चंदण्या नंदीवाला उत्तम तुर्पेनी या कथेत उभा केला आहे.

**'सूर' (आंदण)**

'सूर' या कथेत 'कोरवी' जमातीमधील 'नारायण'चे चित्रण येते. नारायण कोरवीला कलाट वाजविल्याने त्रास होतो, म्हणून त्याची पत्नी त्याला कलाट वाजवू देत नाही. आपली कला आपल्यापासून लोप पावत आहे याचे त्याला दुःख होते हा कलाकार अस्वस्थ होतो.

पिढीजात चालत आलेला छंद,तशा प्रकारचा वादक आपल्या घरी तयार व्हावा, म्हणून तो सतत धडपडत असतो. आपल्या मुलाकडून तशी अपेक्षा केली जाते. त्याचा मुलगा छंदीस्टपणामुळे घरातून निघून गेलेला असतो. आपल्या मुलाकडून ही अपेक्षा पूर्ण होऊ शकणार नाही म्हणून, आपला नातू 'नामा' याला कलाट वाजविण्याचे शिक्षण देतो. यात्रेच्या निमित्ताने गावकऱ्यांच्या समोर 'नारायण-नामाची' जोडी कलाट वाजवते. गावकरी बऱ्याच दिवसापासून नारायणचे कलाट ऐकण्यास अतूर असतात. गावकऱ्यांकडून दोन्ही कलाकारांना योग्य दाद मिळते.

पण कलाटावर प्रेम करणाऱ्या या दर्दी कलाकाराचे स्वर गावकरी जास्त काळ ऐकू शकले नाहीत. त्याच्या जर्जर झालेल्या शरीरामधून अपसूर बाहेर पडले. या कथेत बासरी वाजवणारा नारायण आपली कला पुढे आपल्या नातवाने चालवावी म्हणून धडपडत आहे.

या कथेमधून कलेची आराधना करणाऱ्या नारायण कोरवीच्या कलेचे दर्शन घडविले आहे. कोणत्याही कलेत अपस्वर होऊन चालत नाही त्यामुळे सूर हे शीर्षक योग्य वाटते.

**'सालिंग' (कोंबारा)**

'बाबू' या कथेचा नायक असून, सालिंगावर मोटचं नाडं, सोंदर, कासरं, नांगरणीचं चऱ्हाटं वळून देणाऱ्या मातंगाचे चित्रण येते.

बाबूला मुलाकडून (दगडू) प्रत्येक महिन्यात येणारी मनिऑर्डर थांबते. त्यावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. उपजीविकेचे साधन थांबल्यामुळे तो वेडा होऊन गावात फिरू लागतो. बाबू वेडा झाल्याची शंका गावकऱ्यांना येते.

गावाला गरज नसल्यामुळे बाबूचे साहित्य शेतकरी घेत नाहीत. ट्रॅक्टरने नांगरणी होते, मोटेच्या जागी विद्युत मोटर आली त्यामुळे शेतकऱ्यांची गरज संपलेली असते. बाबू हवालदिल होतो व गावात फिरू लागतो. आपल्या वाटयाला आलेले दुःख आपल्या पत्नीसमोर व्यक्त करताना म्हणतो, ''रखमे हे कसं ग झालं? आपल्याला हे दिवस आलं कसं? गावकीच म्हणं काय, कसं ऱ्हायल न्हाय, आपल्या उमतवारीत कसं हुत? हाताला इसवटा द्यावा म्हणलं तर टाइम नव्हता सारखा वाखात गुंतलेलं. नांगरटीची चऱ्हाटं, मोटचं नाडं, सोंदार, कासरगाडी, मढं आवळायचं म्हणलं तरी पड काढून द्यावा लागायचा. पर आता कुनी हुंगना दिकून.'' [७]

दगडू आल्याचे समजताच त्याला समाधान वाटते. दगडूने घर बांधल्याचे पाहून त्याचे मन शांत होते. पण आपल्या उपजीविकेचे साधन कुठे तरी वळचणीला पडून, काळाच्या गर्तेत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

गुंतलेले पाहून त्याच्या मनाला वेदना होत राहते.

**३)शोषित स्त्री चित्रण कथा :-**

**'चूक कुणाची' (आंदण)**

या कथेमधून कथेची नायिका 'सपना' कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यानंतरही, गरोदर राहिल्याने तिला कोणत्या प्रसंगाला सामोरे जावे लागते याचे वास्तव चित्रण येते.

सपनाच्या चारित्र्याविषयी सासू व जाऊ शंका घेते. नवराही सपनाला अडचणीच्यावेळी साथ न देता शंका घेतो. म्हणून ती आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते. सपनाचे वडील तिला वाचवतात. आपल्या मुलीच्या चारित्र्याविषयी विश्वास असल्याने डॉक्टर तपासणीचा सल्ला दिला जातो. गेणूची तपासणी केली जाते. डॉक्टरना सर्वजण विचारतात. डॉक्टर ऑपरेशनमधील चूक झाल्याचे कबूल करतात. या प्रसंगामधून विज्ञानामधील एखादी छोटी चूक संसारात कसे वादळ निर्माण करते याची जाणिव होते. नसबंदी शस्त्रक्रियामधील चूक 'गुतद्यामध्ये' याच विषयाला स्पर्श करत असल्याचे जाणवते.

स्वतःची चूक नसतानाही सर्व काही मुकाटपणे सहन करणारी अबला स्त्री वाचकाच्या मनातही चूक शोधण्यासाठीची ऊर्मी निर्माण करते. यातच कथेचे मोठेपण लपल्याची जाणीव होते.

**'पाल' (आंदण)**

या कथेमधून ग्रामीण भागातील अंधश्रध्देचे चित्रण केले आहे. कथानायिकेला सतत पाल-पाल म्हणून संबोधल्याने तिच्या दृष्टीसमोर पालीची किळसवाणी प्रतिकृती निर्माण होते. घरातील वाईट घटना घडण्याचे कारण आपल्या घरी आलेली आपली सून आहे. ती पांढऱ्या पायाची

आहे असा अहिल्याचा ठाम विश्वास होतो. त्यातून ती सूनेचा छळ करते.

" बया, बया! ही पांढरी पाल आली तवापस्नं, घराचा हयो खेळ चाललाय ही पाल लवकर घालवाय पायजी. न्हायतर घरबुडी हुनार"[८]

सासूने सुनेचा मांडलेला छळ, यामध्ये सामील असणारी नणंद यामुळे जानकीला त्रास होतो. सुनेच्या वाटयाला येणारे दुःख कथेच्या पानापानामधून करूण प्रसंग निर्माण करत जाते. पाल या शीर्षकामधून ग्रामीण भागातील सासूची आपल्या सुनेविषयीची पारंपरिक मानसिकता प्रकट होते.

**'मुठीतलं माणिक' (कोंबारा)**

एका मजूर स्त्रीला कोणत्या समस्येला सामोरे जावे लागते याचे चित्रण येते. आपल्या मळयात कामाला येणाऱ्या सजीवर बलात्कार करण्याचा खंडू वामन प्रयत्न करतो. खंडूच्या मनातील जहरीपणा सजीला समजत नाही. त्याच्या गोड बोलण्याला ती बळी पडते. त्यामुळे सावज आपल्या टप्प्यात येत असल्याची जाणीव त्याला होते. आपल्या हातातून सजी सुटल्यानंतर त्याला दुसरे काही सूचत नाही. शरीरातील भावनांनी उचल खाल्ल्याने तो तिच्या वस्तीवर जाऊन बळजबरी करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी पाल्यातील विंचू त्याला दंश करतो. आपला वैरी असला तरी त्याला वाचविला पाहिजे म्हणून ती रूईची पाने चोळून त्याचे थेंब त्याच्या नाकात सोडते. खंडूचे विष उतरते. आपण सजीवर अत्याचार केला तरी सजीच्या औषधाने आपल्यावर उपकार केले. ही माणसं धनानी गरीब असली तरी मनानं मोठी आहेत, अशी त्याच्या मनाची खात्री होते. केल्या कृत्याचा त्याला पश्चाताप होतो.

या कथेमधून आपल्या श्रीमंतीच्या बळावर गरीब मजूर स्त्रीला गिळंकृत करू पाहणाऱ्या खंडूच्या राक्षसी प्रवृत्तीचे वर्णन तुर्पेनी केले आहे.

**कल्पना (कोंबारा)**

या कथेमधून कल्पनाच्या सुस्वभावाचे चित्रण केले आहे. 'कल्पना' व 'सयाजी' एकमेकांवर जीवापाड प्रेम करतात. त्यांचा संसार सुखी आहे. सयाजी देवीच्या जागरणाच्या निमित्ताने एका रात्री बाहेर जातो. नजर चुकीने दरवाजा लावण्याचा राहतो. उघडे दार पाहून 'लाल्या परीट' कल्पनाच्या शरीराचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतो, आपला पतीच समजून ती प्रतिकार करत नाही. बाहेरून सयाजीची हाक आल्याने आपल्या घरातील ही कोणीतरी दुसरी व्यक्ती असल्याची जाणीव कल्पनाला होते. त्याप्रमाणे तिने प्रतिकार करून लाथ मारल्याने लाल्या परीट पळून जात असताना पडतो. दरवाजाच्या धक्का लागल्याने सयाजीला आपल्या घरात दुसरीच कोणीतरी व्यक्ती आल्याचे समजते त्यामुळे या सुखी संसारात शंकांचे वादळ निर्माण झाले. सयाजी कल्पनापासून दूर होतो व कल्पनेला सोडचिठ्ठी देण्याचा प्रयत्न करतो. आपल्यामुळे एक संसार मोडत असल्याचे पाहून राक्षसी वृत्तीच्या लाल्याच्या मनातील माणूस जागा होतो. तो पंचांच्या समोर कल्पनाची माफी मागतो.

झाल्या प्रकारात आपल्या पत्नीची काहीही चूक नसल्याचे जाणवताच कल्पना व सयाजीचा संसार पुन्हा नव्या उमेदीने सुरू झाल्याचे ही कथा अभ्यासाताना दिसते.

**'गुतडा' (कोंबारा)**

कुटुंबनियोजनाच्या समस्येतून निर्माण झालेला गुतडा पुरुष नसबंदी हा कुटुंबनियोजनाचा एक उपाय स्वीकारल्याने 'यशवंता' आणि 'सगुणा' यांच्या आयुष्यात उठलेल्या वादळाची ही कथा चित्रण करते.

गरोदरपणाची लक्षणे जाणवू लागल्यावर कोणत्याही स्त्रीला मातृत्वाची सुखद हुरहूर लागते. पण या ठिकाणी सगुणाच्या वाटयाला आलेले मातृत्व हे अनाहूत असते. नवऱ्यानं नसबंदी शस्त्रक्रिया करून घेतली आहे आणि तशात आलेले गरोदरपण पतीव्रता स्त्रीच्या वाटयाला आलेल्या मरणापेक्षाही हिन मरण असते. या जाणिवेच्या सगुणाच्या मनाला डसलेल्या इंगळया सबंध कथेत तिला वेदना देत राहतात.

मातृत्व हे स्त्रीला मिळालेले वरदान असते, पण सगुणाला मिळालेलं मातृत्व हा तिच्यासाठी शाप ठरतो. दहा वर्षे पतीशी एकनिष्ठ राहून संसार केला. मुलांना जन्म दिला पण कधी कुठं वाकडे पाऊल पडले नाही आणि आपल्याच घरचे खात असताना चोरीचा आळ यावा तशी सगुणाची स्थिती झाली. मन सुन्न झाले. काय कराव सुचेना, माहेरला जावे तर तिथली माणस समजून घेतील की नाही कुणास ठाऊक. जीव द्यावा तर मुलांचे हाल होईल. या तिच्या मनाच्या गोंधळात एक दिवस गुपिताला तोंड फुटते. पाणवठ्यावर परटाच्या जनीच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. आणि घरच्यानाही लक्षात आली. व्हायचा तो परिणाम झाला. नवऱ्याने डोक्यात राख घालून घेतली. सगुणाला मारझोड सुरू झाली. पण शरीराच्या मारापेक्षा, मनाला झालेल्या यातना सगुणाला सुन्न करून सोडतात. यावरून पतीव्रतेबद्दलची अपेक्षा आणि अनैतिकतेबद्दलची उपेक्षा किती भयानक आहे याची कल्पना येते.

यावर सगुणाने घर सोडून जावे एवढाच पर्याय निघतो. पण घर सोडून जाताना कलंक घेऊन जाणे तिच्या मनाला सलत राहते. विचारांच्या गर्तेत अधिक गुंतत असताना अहिलेला सोसाव्या लागलेल्या दुःखाची तुलना करते. पण तिची तुलना त्या दुःखाशी होत नाही. कारण इंद्राने भोगलेल्या अहिलेच्या वाट्याला कलंक होता. पण सगुणा तर पतीव्रता होती.

दुसऱ्या दिवशी घर सोडताना मात्र सगुणाच्या थोरल्या दिरानं हा गुतडा सोडविला. यशवंताला तालुक्याला डॉक्टरकडे नेऊन तपासणी करण्याचे ठरले आणि त्याप्रमाणे तपासणी झाल्यावर यशवंताच्या नसबंदीतील त्रुटीच सगुणाच्या मातृत्वाला कारणीभूत होती, याची जाणीव होताच, सगुणाला अहिल्याच्या उध्दाराचा आनंद झाला.

विज्ञान वास्तव जाणते पण भावना, नाती-गोती आणि त्यातले नीतिमूल्यांचे नाजूक पदर मात्र समाजाच्या जडणघडणीवर परिणाम घडवून आणतात. सगुणाच्या या गुतड्यात वाचकाला आपल्या कसदार भाषाशैलीने गुंतवून टाकण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. यातच या कथेचे यश

साकारले आहे.

'वणवा' (कोंबारा)

ही कथा स्त्रीच्या संसारातील दुःखाची वेदना चित्रित करते. पहिल्या नवऱ्याकडून होणारी मारझोड व पैशाची मागणी पाहून सखू नवऱ्यापासून सोडचिठ्ठी घेते. तिचा दुसरा विवाह होतो. या ठिकाणीही तिला फारसे सुख मिळत नाही. घरातील कोणतीच वस्तू तिच्या हक्काची राहत नाही. हा संसारही वणव्यासारखा तिच्या शरीराची होळी करत राहतो.

दुसऱ्या घरीही सखूला सासू सतत त्रास देत राहते. त्यामुळे एका सासूरवाशिणीची दोन्ही संसारांमधून कशा प्रकारे उपेक्षा होत राहते, याची करूण कहाणी ही कथा चित्रण करते.

**'पारंबी' (आंदण)**

या कथेमधून स्वतःच्या संसाराचे स्वप्न पाहणाऱ्या एका सुहासिनी स्त्रीचे चित्रण येते.

घरातील शेवटचे लग्न असल्याने मोठ्या थाटामाटात करून दिले जाते. तिच्या नवरा मुंबईचा कामगार असल्याने तो काही दिवस राहतो. नोकरीच्या ठिकाणी नवरा गेल्याने ती सासरी न राहता माहेरी जाते. भावाचा संसार पाहून आयुष्याचा विचार करते. पारंब्याचे अंधातरी जीवन व आपले जीवन यामध्ये तुलना करते. पारंब्यांचे जीवन वडाचा आधार तोपर्यंत असते. तसे आपल्या भावाचा आधार संपताच आपले जीवन पारंब्यासारखे असेल हा प्रसंग तिच्यापुढे उभा राहतो.

> ''हया पारंब्या आतराळी, कवा फुलेत नायत्या कवा फळत नायत्या त्यांच्या नशिबात ते सुख नाय''[१]

शांताला दुसऱ्या विवाहाविषयी सुचविले जाते. दुसऱ्या लग्नाचा विचार सुचविताच ही मानभावी स्त्री कडाडून हल्ला चढविते.

या कथेमधून एकाकी जीवन जगत असताना आपले आयुष्य कसे असेल यांची तुलना करणाऱ्या शांताच्या जीवनाची चित्तरकथा आवतरली आहे.

'वाली' (कोंबारा)

या कथेमधून परिस्थितीने अगतिक बनलेल्या वालीच्या जीवनाची परवड येते.

वालीचा नवरा 'किसन' अचानक आजारी पडतो. वाली बाळंतीन असते. कर्ता पुरुष आजारी पडल्याने तिला रोजगार करावा लागतो. आपल्या पिकावर ओल्या बाळंतीनीच्या शिवाशिवीचा परिणाम होईल असे शेतकऱ्यांना वाटते. म्हणून काम दिले जात नाही. यातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची अंधश्रद्धा प्रकट होते. दीराच्या ओळखीने वाली धरणाच्या कामावर मजुरी करू लागते. परिस्थितीने अगतिक बनलेल्या या स्त्रीचा दीर गैरफायदा घेतो. मुकादमाकडून त्याने पैसे घेतलेले असतात. त्या मोबदल्यात तिचे शरीर तो विकू पाहतो. मुकादम गर्तेत सापडलेल्या स्त्रीकडून शरीरसुखाची मागणी करतो. शीलाचे रक्षण करणारी ही स्त्री त्याला विरोध करते. मुकादम आपल्यावर बळजबरी करण्यापाठीमागे आपला दीराचा हात असल्याचे तिला समजते. ठरलेल्या सौद्याप्रमाणे वाली वागली नसल्याने पैशाच्या अपव्यवहाराचा आरोप तिच्या दीरावर मुकादम करतो. त्याला तुरुंगात ठेवले जाते.

वालीचा नवरा आजारी असताना त्याला वाचविण्याचे काम दीराने केलेले असते. वाली उपकाराला जागते. ती दीराला सोडवून आणते.

कसाई प्रवृत्तीचा दीर आपल्याशी वाईट वागला तरी त्याच्या उपकाराच्या ओझ्याखाली दडपलेली वाली कशी वागते याचे चित्रण या कथेमधून येते. उपकाराची फेड उपकारानेच हा संदेश या कथेमधून विशद होतो.

**'जाचणूक' (कोंबारा)**

या कथेतून सासू व नणंद सुनेचा कशा प्रकारे छळ मांडतात याचे दर्शन घडते.

भिवाच्या पहिल्या बायकोला सासू राही व नणंद पिरती संगनमत करून पळवून लावतात. दुसऱ्या लग्नाची बायको 'येसू' त्यांच्या संसारात येते. भिवाचे येसूवर जीवापाड प्रेम असते. तो तिला समजून घेत असतो. येसूला नणंद व सासू मिळून अनेक दोषांचा ठपका तिच्यावर ठेवतात. तिला भांडी व स्वयंपाक करता येत नाही म्हणून तिचा छळ करतात. तिला अन्न खाऊ देत नाहीत. येसूला संसारातून पळवून लावण्यासाठी रामाचा आधार घेतात. पण पतीपत्नीमधील असणारे प्रेम येसूला संसार धाग्यात गुंतवून ठेवते. भिवाच्या आधारामुळे तिला जरी त्रास होत असला तरी ती सहन करते.

ग्रामीण भागातील सुनेचा कारण नसताना छळ करण्याऱ्या सासूचे चित्रण कथेतून येते. कोणत्याही प्रकारचे कारण नसताना सुनेला जाच होतो. त्यामुळे जाचणूक शीर्षक कथेची उंची वाढविण्यास मदत करते.

**४) प्रेम चित्रण कथा :-**

उत्तम बंडू तुपे यांच्या प्रेमदर्शनातील लक्षणीय विविधता जाणवते. या प्रेमकथेमधून दिव्य सौंदर्याचा व अलौकिक प्रेमाचा साक्षात्कार झाला आहे. प्रीतीकडे पाहण्याची लेखकाची भूमिका या कथांचा अभ्यास करत असताना दिसून येते. या कथासंग्रहातील प्रेमाचे चित्रण करणाऱ्या कथा पाहणे गरजेचे वाटते.

**(१) गडयाची आढी :-** (कोंबारा) गडयाची आढी ही प्रेमाचे चित्रण करणारी एका वेगळया वळणाची कथा आहे.

तुपेंच्या इतर कथांचा अभ्यास करताना वास्तवतेचे विदारक दर्शन घडते. या कथेत मात्र कल्पनातरंग, स्वप्नरंजनाची झालर देऊन नर्म विनोद साधण्याचा प्रयत्न केला आहे.

किरकमल शेठच्या शेतावर राबणाऱ्या दामूच्या अज्ञानी, भोळसट मनातल्या इच्छा व्यक्त करताना ही कथा विनोदाच्या अंगाने पुढे जाते. प्रेम व्यक्त करण्याची जाती थोडीशी विचित्र आणि विसंगत असल्याची जाणीव होते.

दामूच्या अज्ञानीपणात आणि साधेपणात एक उपेक्षित प्रेमवीर लपला आहे. हा खुळा-कावरा जीव म्हणून कुणाच्याच खात्रीत नाही. स्वतःच्या नव्हे तर मालकाच्या शेतात राब-राब राबतो. पण मालकाला त्याच्या विषयी कणव वाटत नाही. मनाला आधार म्हणून एक जीवलग मित्र आबिऱ्या आणि दामूचा जीव असलेली यमी त्याला जवळची वाटतात. पण यमी मात्र दामूकडे म्हणाव्या तेवढ्या प्रमाणात आस्थेने पाहत नाही. सर्वांकडून उपेक्षा झालेल्या दामूच्या प्रेमाविषयी कोणालाच सहानुभूती वाटत नाही. आपल्याकडे कोणाचे लक्ष नसल्याची खंत त्याला त्रास करत राहते. खऱ्या मरणाची कल्पना नसलेला दामू मरणाच सोंग घेतो. आबिऱ्या सोंगाला साज चढविण्याचे काम करतो.

दामूच्या मृत्यूपासून त्याला तिरडीवरून अंत्यविधीपर्यंत नेण्याचा प्रसंग विनोदाची झालर देत खूलवत नेला आहे. पण दामू खरच मेला आहे, असं समजणाऱ्या गावाला आणि किरकमल शेठला दामूच्या मरणाचे दुःख वाटत नाही. मग त्यांच्या डोळयात आश्रू येणे तर दूरच, त्यामुळे या कथेला कारूण्याची किनार लाभली आहे.

दामूच्या मरणाचं कुणालाच काही वाटल नाही तरी यमीच्या हृदयात मात्र कणवेचा अंकुर निर्माण होतो. तिरडीवरून वडाच्या फांदीवर चढलेला दामू आणि खांदेकरी पळून गेल्यावर सोबत आलेला आबिऱ्या यांना यमी वाटेतच भेटते आणि या खैसाला हडळ मिळते आणि त्याला स्वर्गाची दारं खुली होतात.

आबिऱ्या मुंज्या राहतो आणि मृत्यूच्या कल्पनेतून दुसऱ्यांची सहानुभूती मिळविणाऱ्या व त्यातून प्रेम व्यक्त करण्याऱ्या प्रेमवीराची कल्पना जगवेगळया प्रेमसंकल्पनेची जाणीव करून जाते.

**'वण' (कोंबारा)**

समाजाच्या दोन स्तरातील मनांचे मिलन होताना हजारो वर्षांपासून किती तरी प्रेमवीरांच्या जोड्या मिलनाअभावी भटकत राहिल्या. 'वण' कथेचा नायक नायिकेची अशाच मूल्यांच्या आघाताने झालेली ताटातूट या कथेत दिसून येते.

मनापासून एकमेकावर प्रेम करणाऱ्या दोन जीवांची ही कथा आहे. दोघांचा सामाजिक दर्जा मात्र भिन्न आहे. 'मैना' आणि 'मव्हण्या' रानाच्या सान्निध्यात रमणारे प्रियकर-प्रेयशी आहेत.

पडलेला आयतापाड खाण्यापेक्षा ढाळयाढाळयांना धुंडाळत वर चढून पाड खावा यांची इच्छा. अशी ही दोघं बेभान होऊन एकमेकांच्या प्रेमात पडतात. एकमेकाला शब्द देतात. पण मैनाच्या भावाच्या दृष्टीतून हे प्रेमप्रकरण सुटत नाही. उपाय म्हणून मव्हण्याला वडूजला नेऊन सोडले जाते. काही महिन्यांनंतर एकमेकांच्या ओढीने ते जवळ येतात. तितकेच दूर जातात. आपले प्रेम सफल होऊ शकणार नाही हे दिसताच, आपल्या प्रेयशीने लग्नाचा विचार करावा म्हणून आपला विचार व्यक्त करतो. हा विचार मैनाला पटत नाही. ती म्हणते,

"न्हाय म्हवण्या आता पाड सरला

वाण गेला जगायचं आता फक्त मनासाठी

अंगभर भोगलेल्या या वाणासाठी"१०

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या कथेमधील प्रसंग शब्दबद्ध करत असताना निसर्गातील प्रतीक-प्रतिमांचा वापर करून प्रेमाचे चित्रण केले आहे. त्यासाठी आंब्याच्या झाडाचा आणि पाडाचा प्रतिकात्मक वापर केला आहे. तारूण्यातील पहिल्या दिवसातील चव तुळसाला समजावणारी मैना स्वतःच्या घराची पर्वा करत नाही आणि खुशाल वडाच्या फांदीसकट मव्हण्यानं काढलेल्या मधाच्या पोळयाचा मध चाखण्यात दोघांना आनंद वाटतो.

समाजाच्या दोन स्तरात जगणाऱ्या या दोन जिवांना प्रस्थापित समाजाने एकमेकांपासून अलग केले. पावसाने झोडपलेल्या आंब्यासारखी झालेली मैना मनावरचे वण मात्र जपत राहते. त्यातच तिच्या प्रीतीचा ठेवा असल्याची जाणीव कथा अभ्यासत असताना होते.

**'एकतारी' (कोंबारा)**

अंध कलाकारावर निर्व्याजपणे प्रेम करणाऱ्या शालूचे चित्रण या कथेमधून आले आहे. लौकिक जीवनात जगणारा शालूचा बाप तर निरपेक्ष प्रेम करणारी शालू, आंधळया कुरूप शांतारामवर प्रेम करते. वास्तव जीवनात पतिवियोगाच्या आघातातून बाहेर पडते न पडते तोच तिच्या दुखऱ्या मनावर फुंकर घातली ती शांतारामाच्या एकतारीच्या झंकाराने. प्रेम आंधळे असते हे तर खरेच, पण ते वेळप्रसंगी आंधळया, कुरूप जिवावर जडू शकते तसे शालूचे झाले. ती एकतारीच्या सुरात आणि शांतारामच्या शब्दात गुरफटून गेली. मग तिला वास्तवाचे भान ठेवणेही आवश्यक वाटले नाही. वडिलांकडून समज मिळाली, गावाकडून कांगावा झाला. तरी शांतारामपासून ती दूर झाली नाही. वडिलांनी एक दिवस दोघांच्या मनाबरोबर शरीराचे वाभाडे काढले आणि शालूच्या बंडखोर मनाने शांतारामसह गाव सोडले. खऱ्या प्रेमापुढे कष्ट यातना यांना फारसे महत्त्व असत नाही. उलट अशा कष्ट यातनांच्या मार्गावरूनच खऱ्या प्रेमाच्या मंदिराकडे जाता येते. प्रेमाने झपाटलेल्या शालूच्या उलट अवस्था शांतारामची आहे. तो स्वतःच्या एकाकी जीवनावर खूश असतो. आपल्याबरोबर इतरांची ओढाताण करून घेण्यासाठी शालूला पत्करने त्याला मान्य नसते. पण

शालूच्या प्रेमापुढे पराभूत होऊन शालूची सोबत घेणे भाग पडते.

आंधळया, कुरूप मालकाबरोबर दहा वर्षांचा संसार करताना शालूला कृतकृत्य वाटते. त्यांचा संसार सुखी असतो. दोन मुले होतात. समाधानात दोघेही असतात. पण नियतीने दोघांचा डाव उधळवून लावला. शांताराम अचानक सर्वांना सोडून गेला.

खऱ्या प्रेमाला कशाचीच पर्वा नसते म्हणून तर शांतारामच्या मृत्यूनंतर त्याच्या एकतारीच्या झंकारणाऱ्या स्वरातून त्याला पाहते. हाच खऱ्या प्रेमाचा साक्षात्कार वाटतो.

**घडी (कोंबारा)**

घडी ही कथा ताटातूट झालेल्या पती-पत्नीच्या प्रेमामुळेच, पुनर्मिलनाची वाट पाहते. त्यामुळे दोन जिवांच्या ताटातुटीतील कारूण्य कथेतून येत असल्याचे जाणवते.

आढयाला बांधून ठेवलेल्या बार्शिंगानी एकमेकाला बिलगून बसावे. पण हे भाग्य कला व आपल्या नशिबात नसावे याचे दुःख रानूला दुःखी बनवते. मुलाचा लिलाव मांडणाऱ्या वडिलाबद्दलची मनस्वी चीड कथेमधील वाक्या-वाक्यांमधून जाणवते.

गावातली मुलगी आणि गावातीलच नातलग, पण पैशासाठी वडिलाने सुनेला माहेरी हाकलली. दोघा नातलगाचे मळे एकमेकाला लागून असतात. मध्ये एक बांध मर्यादा म्हणून असतो. पण हाच बांध रानू आणि कलाच्यामध्ये अभेद भिंतीसारखा उभा असतो. दोघांनाही जवळ असून एकमेकापासून दूर ठेवणारा हा बांध जणू रानूच्या बापाचं प्रतीक असल्याची जाणीव होते.

दोघेही एकमेकांसाठी झुरत असतात. रानूचा बाप त्याचे हुंडयासाठी दुसरे लग्न ठरवितो. हे लग्न रानू स्वतःच मोडतो. प्रसंगी बापाची चपराक खातो. रानू तसाच सासऱ्याच्या घरी जातो आणि आपण कलाला न्यायला आल्याचे सांगतो. कला आणि कलाचा बाप याच घडीची वाट

पाहत असतात. ही घडी म्हणजे रानूला स्वत्वाची जाणीव करून देणारी घडी, दोन विरही मनांच्या मिलनाची घडी. या कथेच्या सुखांतिकेची घडी असल्याची जाणीव कथा अभ्यासत असताना त्याचा प्रत्यय येतो.

**सारांश :-** कथेमधून येणारी पात्रे ही परिस्थितीने अगतिक बनल्याचे जाणवते. कथेतील व्यक्तिरेखा प्रवाहाच्या विरोधात वेगळा पवित्रा घेत असल्याचे जाणवत नाही. आल्या प्रसंगाला निमूटपणे सामोरे जाणे हा गुण पात्रांच्या व्यक्तिमत्त्वात आल्याने सर्व व्यक्तिरेखा वाचकांची सहानुभूती मिळवितात.

**अ) व्यक्तिचित्रण :-**

उत्तम बंडू तुपे यांच्या कथासंग्रहांच्या अनुषंगाने कथेमधील ठळक व्यक्तिचित्रणे पाहणे महत्त्वाचे आहे. यांच्या कथामधून मानवी मनाचे पडसाद उमटले आहेत. त्यातून माणूस शोधण्याचा प्रयत्न केला आहे. उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतील व्यक्ती या समाजात व जीवनात आलेल्या अनेक अडचणीना निमूटपणे सामोरे जातात. वाटयाला आलेल्या भोगवटा नियतीचा भाग म्हणून स्वीकारतात. अनुभूतीतील दैन्य, दुःख, दारिद्रय अत्यंत सरळ, शांतपणे आविष्कृत करून लोभस भावबंध साकार केले जातात. त्यांची जीवनाची अनुभूती महत्त्वाची वाटते. ग्रामीण भागातील स्त्रिया, शेतकरी, भटके उपेक्षित लोक, सालगडी म्हणून शेतावर राबणारे मजूर यांच्या स्वभावाचे दर्शन घडवितात. यावरून तुपे यांच्या ग्रामीण जीवनाचे, संस्कृती व परिसराचे सुक्ष्म निरीक्षण आढळते. ग्रामीण कुटुंबांमधून स्त्रियांची होणारी कुचंबना, भावनिक कोंडमारा इत्यादी तपशील ते देतात.

उत्तम तुपे यांचा पिंड ग्रामीण भागात घडलेला आहे. ग्रामीणांच्या व्यथा-वेदना त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. त्या स्वतः भोगल्या आहेत. ग्रामसंस्कृतीशी येणारा संबंध अजूनही टिकून आहे. त्यामुळे ग्रामीण मातीत रूजलेली नाळ ग्रामीणांच्या व्यथा-वेदना अक्षरबद्ध करण्यात गुंतून राहिली असल्याचे जाणवते.

उत्तम तुपे यांच्या कथा व्यक्तिकेंद्रित असल्याने व्यक्तीच्या समस्यावर भर देणाऱ्या आहेत. याबरोबरच स्वभाव विशेष यावरही लेखकांची दृष्टी असल्याचे जाणवते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्रणात आढळणारे विशेष आता लक्षात घेऊ.

काही कथातून व्यक्तींचे प्रत्ययकारी चित्रण करतात.

**शिसारी (आंदण)**

शिसारी कथा वेनूचे स्त्री चित्रण करते. नेवर्तीचे लग्न होते. 'वेनू' त्याच्या जीवनात प्रवेश करते. दोघांचा संसार सुखी असला तरी त्यांना अपत्य होत नाही. तशी गडबडही त्यांना नसते. धुरपा मोकळया वेळात स्त्रियांच्यात जाऊन बसते. त्यांच्या बोलण्यावरून आपल्या सुनेला लवकर मुले व्हावीत म्हणून ती प्रत्येक देवाला साकडे घालते. भागी जोगतीनीच्या देवाला नवस बोलते. आपल्याला नातू झाला नाही तर ही संपत्ती कुणाची, आपल्याला शेवटचा आधार कुणाचा मिळेल, असे प्रश्न तिला भंडावून सोडतात.

धूरपाच्या स्वभावाचा भागी जोगतीण गैरफायदा घेते. झोपलेल्या वेणूच्या शेजारी लिंबू, बिबे नेऊन टाकते. आपल्या घरावर कोणी तरी करणी केली म्हणून धूरपाचा जीव टांगणीला लागतो. वेणूला मुले होत नसल्याचे कारण हेच असावे असे तिला वाटत राहते.

शेजारची 'सीता' गप्पा मारण्यासाठी येते. दोघींच्या सुनांच्यात तुलना केली जाते. आपल्या सुनेला मुले लवकर कशी झाली, तुझी सुन वांझ असावी असे ती बोलते. भावाची मुलगी असल्याने वेनूला माहेरी हाकलून देता येत नाही. त्यामुळे धूरपा नाराज असते.

निसर्ग नियमाप्रमाणे वेनूला डोहाळे लागतात. अन्नावरची वासना उडते. वेनूला शिसारी लागते. आपली सून गरोदर असल्याबद्दलची माहिती धूरपाला लागते. तिचे डोहाळे पुरविण्याचे मनसुबे रचले जातात. 'वेनू - फणसाच्या पोळीवर वासना झालीय' असे म्हणतात तिला

धुरपा म्हणते खबरदार फणसाचे नाव काढशील तर. फणस खाल्ल्याने गर्भ पडतो अशी ग्रामीण भागातील रूढ समजूत या ठिकाणी प्रकट होते.

डोहाळे पुरविण्यासाठी नरसिंहवाडीहून कवटाची बर्फी आणून तिच्या डोहाळयाची हौस पुरविण्याचे ठरते. दिवसेंदिवस गर्भारपणातील वेनूच्या शरीरातील बदलाचे चित्रण योग्य वाटते.

उदा.'दिवस जात हुतं नि वेनूच्या अंगाला गुबारा वाढत होता. वटीपोटाला आकार येत होता. नि अंगावरची पिवळी साई दाट घट्ट हुत चालली, पन वखाऱ्या थांबत नव्हत्या''[११]

या चित्रणातून गर्भारपणाचे वर्णन येते. स्त्रीला गर्भारपणात लागणाऱ्या शिसारीचे वर्णन आल्याने कथेच्या शीर्षकाची यथार्थता जाणवते.

**'चिंबाड' (आंदण)**

या कथेमधून 'मंजाचे' प्रत्ययकारी चित्रण केले आहे. स्वतःच्या शरीराचा विचार न करता किंवा आपल्याला इतरांच्यापेक्षा ढोरकष्ट करावे लागते. असे कष्ट करत असताना आपले सर्व अंग घाणीने बरबटले आहे, याचा ती विचार करत नाही. शेतीतील कामे बंद असल्याने ती विश्रांती न घेता अथक परिश्रम करून स्वतःचे घर सारवण्यात मग्न असते. अशा सारवण करणाऱ्या स्त्रीचे चित्रण या कथेत आले आहे. अशी सारवण करणारी स्त्री आपल्यासमोर उभी करण्याचे सामर्थ्य तुपेंच्या लिखानामधून दिसून येते.

उदा. ''खाली भुईचा तवा चुलीवर ठेवल्यागत वरनं उन्हाचा नुसता जाळ. पाण्यात बुडवून काढल्यागत अंग घामानं चिंब भिजलेले बुड फुटलेल्या घमेल्यातनं झरतेली माती टकुरित पडतेली. माती घामानं भिजून घामाच्या पाण्यातनं मिसळून खाली गळयावर नि छातीवरनं खाली म्हणताना पुराच्या पाण्यानं आणलेला गाळ पूर ओसरल्यावर दुथडीला दिसावा तसं मंजाच्या अंगावर ठेवन दिसत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

होती. तरी तिचं माती वाहयाचं काम एका सुरात चालल होतं. न्हारी वक्तापासून मंजा मातीला टक्कूरं देऊन चालत होती.''[१२]

कष्टाच्या चरकात पिळवटून गेलेली अन् तरीही आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणारी मंजा या कथेत भेटते.

ग्रामीण स्त्रीला म्हणावे तसे स्वातंत्र्य नसते किंवा स्त्री अधिकाराची तिला जाणीवही नसते. त्यामुळे आपली एखादी मागणी ती पूर्ण करू शकत नाही. आपल्या पतीची योग्य प्रकारची साथ नसतानाही एकटीच घराची चिंबाडं भरते. संध्याकाळी नवरा दारू पिऊन येतो आणि मनासारखे जेवण न झाल्याने भरले ताट तिच्या अंगावर फेकतो. पण हे सर्व कोणत्याही प्रकारचा त्राग न करता शांतपणे सहन करते. मंजाच्या प्रातिनिधिक स्त्रीचित्रणामधून ग्रामीण भागातील स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होते.

**'रानबा' (कोंबारा)**

या कथेमधून 'रानबा' चे प्रत्ययकारी व्यक्तिचित्रण केले आहे. त्याबरोबरच स्त्रीवर कशाप्रकारे अन्याय केला जातो, हुंडा समस्या सुखी कुटुंब उदध्वस्त होण्यास कशी कारणीभूत ठरते हे या व्यक्तिचित्रणातून येते. त्याला प्रिय असणारी 'सुगन' वडिलांच्या हुंडयाच्या हव्यासामुळे इच्छा नसताना माहेरी पाठवावी लागते. त्याचे शेतीमधील कामात लक्ष लागत नाही किंवा घरची आपुलकी संपते. जीव गलबलून जातो त्याच्या एकाकीपणाचे चित्रण येते. उदा.-

''भरलेल्या घराकडं रानबा डोळं वासून बघतेला तरी घराला, एकटं एकटं वाटतेलं कारण सुमन घरात नव्हती. रानबाची नजर कावरीबावरी झाली. रानबाला वाटलं सुमनला हाक मारावी. तरी तो तसाच तोंड दाबून बाहेर आला. अंगणात उभं राहून त्येनं गोठयात डोळं टाकलं. तसा गोठा अंगावर धावून आल्यागत झालं दावण उठून उभा राहिली.''[१३]

सुमनच्या वडिलाने सासरच्या मागणीप्रमाणे हुंडा दिला तरी लॉकिट हवे असते त्यामुळे घरचा विचार न करता आपल्या पत्नीला आणण्यासाठी जातो. एकीकडे घर तर दुसरीकडे पत्नी अशा द्विधा अवस्थेतील रानबाच्या भावअवस्थेचे व्यक्तिचित्रण या कथेतून चित्रित केले आहे.

**'फास' (कोंबारा)**

फास कथेतील 'उमाजीची व्यक्तिरेखा चित्रित करत असताना त्यांच्यासोबत मनात निर्माण झालेल्या शंकांचे भावआंदोलन येते. इच्छा नसताना घरी जाणे क्रमप्राप्त होते. पत्नीच्या ओढीपेक्षा आपली लहान मुले त्याच्या समोर उभी राहतात आणि तो घराची वाट चालू लागतो.

अशा उमाजीचे चित्रण येते.

उदा.-" उमाजी घरी चालला होता. त्येला घरी जाव असं वाटत नव्हतं तरी घराच्या ओढीनं त्याचे पाय निघाले होते. कोवळी माया त्याच्या काळजाला ढोसण्या देत होती. ती करपलेली आतडी आतल्या आत आगीत फुलवत होती. त्येच्या वेदनानी त्यांच डोळं, पार हाडाच्या कपारीत गेलं होतं नि त्येच्यातून निघालेली नजर वाटेच्या बगलेला वाटेचा आधार धरून असलेल्या घराक डं लागली होती."[१४]

नवरा मजुरीसाठी बाहेर गेला असताना 'नली' गावातील 'मारुती' बरोबर संबंध ठेवते, याची कुणकुण उमाजीला लागते. त्यामुळेच त्याला घरी जाऊ नये असे वाटते. शारीरिक भूक तो समजून घेतो त्यामुळे दुर्लक्ष करतो. प्रत्यक्षात आपल्या समोर आपली पत्नी दुसऱ्या व्यक्तीच्या बाहुपाशात असलेली पाहताच तो त्रागा करतो, दोघानाही मारझोड करतो. परिस्थितीने अगतिक बनलेल्या उमाजीचे व्यक्तिचित्रण लेखकांनी यथार्थपणे उभे केले आहे.

'चळवळीची वळवळ' (कोंबारा) या कथेतील 'भिका पाटील' याच्या बेरकीपणाचे विविध पैलू या व्यक्तिचित्रणातून मांडले आहेत. आदर्श गावाची संकल्पना गावचे ज्येष्ठ नेतेमंडळी

मांडतात त्याला दुजोरा सरपंच देतात. गावात दारूबंदी केली जाते, कुटुंबनियोजनाची मोहीम राबवली जाते. हुंडा घ्यायचा किंवा द्यायचा नाही असे ठरविले जाते. गावमिटींगमध्ये हे ठरते, पण गावचे नेते या नियमाला अपवाद ठरतात. 'बोलाचा भात बोलाचीच कडी' अशी त्यांची वृत्ती असते. गावच्याअगोदर भिका पाटील चावडीत दारू पिऊन बसतात आपण कुठे आहे याचे त्याला भान नसते. अशा दारूत झिंगलेल्या व शरीराचा तोल सुटलेल्या भिका पाटलाचे व्यक्तिचित्रण प्रभावी वाटते. उदा. –

''गावच्या टकुरीवर गुंफलेल्या तारांच्या रिंगणात डोळं गुंतवून भिका पाटील बसलेला. तोंड राघूच्या चोचीगत झालेलं तरी पानाचा विडा तोंडात, चावडीचा कोपरा रंगलेला. तारेच्या रिंगणातून सुटलेलं डोळं खाली उतरलं तसा भिका पाटील भानावर आल्यागत झाला.' आयला मी, सा आपण कुठं हाय. घरात का चावडीत? चावडीतच हाया नव्हं?''[१५]

या कथेतील ही व्यक्तिरेखा बेरकीपणाचा कळस करते. दारू घ्यायची नाही असे ठरलेले असताना बैठकीत दारू पिणे सुरू असते. 'मुलगी पिवळी करून धाडा मंजी आमचं समाधान झालं' अशी पळवाट काढली जाते. आपली ही युक्ती दुसऱ्यांना सांगताना पाटील सांगतात 'जे येतंय ते मागच्या हातानं खाली बघून घियाचं मंजी झालं'

या कथेमधून सरकारी योजनांचा कसा विकृत अर्थ काढला जातो, याचे चित्रण 'भिका पाटील' यांच्या व्यक्तिचित्रणातून प्रभावीपणे मांडल्याचे जाणवते.

'पारंब्या' (आंगण) या कथेमधून 'शांता' या स्त्रीचित्रणामधून तिच्या अंगभूत गुणांचे चित्रण केले आहे. घरातील शेवटचं लग्न म्हणून शांताचे वडील तिचा विवाह मोठ्या थाटामाटात करून देतात. तिचा नवरा मुंबईचा गिरणी कामगार असतो. लग्नाच्या अगोदर त्याने आपली हौस पूर्ण केल्याने लग्नाविषयीची आस्था त्याला वाटत नाही. घरच्यांच्या भीतीमुळे तो बोहल्यावर चढतो. लग्न होताच तो परत मुंबईला निघून जातो. सासूच्या त्रासाला कंटाळून 'शांता' माहेरी

येऊन राहते. माहेरी वडिलांना शेतीच्या कामात मदत करते. पण तिची अस्वस्थता संपत नाही. आपल्या आयुष्याचा शेवट कसा असेल हे शोधत असताना तिला वडाच्या अंतराळी असलेल्या पारंब्यांची आठवण होते. घरी आलेला पाहुणा तिला दुसऱ्या लग्नाविषयी सुचवितो तेव्हा ती आपल्या भावना करारीपणे व्यक्त करते. ''खबरदार! सांगून ठिवती, माझ्या बाबतीत कुणी बोलायचं नाही. माझा इषय कुणी घिटला तर मी बरी जाणार न्हाय, पहिल्यानं काय दिवं लावलं नांदवून, तवा दुसरा लावणार हाय! मला दुसरा नवराय करायचा न्हाय.''[१६]

शांता एखाद्या तपस्विनीसारखी आपल्या निश्चयावर आढळ राहते. वडाच्या झाडासारखी आतून पोखरलेली असली तरी वरून न दाखविता जगण्याचा प्रयत्न करते या चित्रणामधून एका करारी स्त्रीचे चित्रण प्रभावीपणे आल्याचे जाणवते.

'सवड' (आंदण) ही कथा भिक्षुकी मागून गावच्या आराध्यदैवताची पूजा करणाऱ्या 'बाळूभट्टाचे' चित्रण करणारी आहे. बदलत्या काळानुसार दलितांपेक्षाही ब्राह्मणांचे जीवन कसे दिशाहीन बनले याचा प्रत्यय या व्यक्तिचित्रणामधून येतो. ब्राह्मणांच्या खंडाने केल्या जात असणाऱ्या जमिनींचा खंड शेतकरी बुडवू लागले. त्यामुळे त्यांच्या जीवनात अस्थिरता निर्माण झाली, जीवन कंटाळवाणे झाले.

'खटमट्यां'च्या वस्तीवर भिक्षुकी मागण्यासाठी गेलेल्या ब्राह्मणाला दहा पैसे भिक्षुकी दिली गेली. त्यामुळे बाळूभट्ट आजच्या आणि पूर्वीच्या दिवसांची तुलना करू लागतो. 'बापू शेंडे' यांच्या वस्तीवरील अनुभव त्याला हादरवून टाकतो. त्याचा मुलगा 'माधव' ब्राह्मणाच्या भाकड कथेवर विश्वास ठेवायला तयार होत नाही. अशी सर्व बाजूनं झालेली कोंडी पाहून बाळूभट्ट अस्वस्थ होतो.

उदा. ''बाळूभट्ट उठला दिवसावं गावळतीला अंग झुकवलं धान्याची पिशवी पाठीवर टाकून बाळूभट्ट जड पावलानं परत वळला वाट उरकत नव्हती नि तेवढया धान्याच्या वझ्यानं बाळूभट्ट

काकुळती आला हुता. आधिच जड झालेला जीव, त्यात हे वझं; आनखी इचारानं टक्कुर भरडत चाललेलं. सकाळी सुनंदाला शाळेतून हाकलून दिलेल हुतं. तो विचार उभा हुताच आसं आनखी टक्कुऱ्यात धिऊन बाळूभट फाटयावर आला.''[१७]

नोकरीसाठी मुलाखत देऊन आलेल्या आपल्या मुलाचे अनुभव ऐकल्यानंतर आपल्या गावातील पूर्वीचे दिवस संपल्याची जाणीव त्याला होते. तो आपल्या मुलाला हे गाव सोडून दुसऱ्या गावी उपजीविकेचे साधन मिळविण्याची सूचना करतो. बाळूभट्ट ब्राह्मण समाजाच्या हलाखीचे प्रातिनिधीक स्वरुपात प्रकटीकरण करतो. बाळूभटाच्या वाटयाला आलेल्या दुःखाची जाणीव या व्यक्तिचित्रणातून होते.

**'पाड' (कोंबारा)**

या कथेतील 'कुशाबा' या व्यक्तिचित्रणामधून शेतकऱ्याच्या जीवनातील जाणिवांचे चित्रण प्रभावीपणे केले आहे. आपल्या शेताच्या बांधावरील आंब्याचा पाड उतरायला त्याला मजूर मिळत नाही. मिळवती मुले नोकरीच्या निमित्ताने वेगळा संसार थाटतात. आपण ज्या प्रतिकूल परिस्थितीतून शेती खरीदी केली त्याचा शेवट काय, असा प्रश्न त्याला भेडसावत राहतो. वेळप्रसंगी आंब्याखाली रात्री वस्ती करून राखण करतो. आंब्याच्या उत्पन्नावरच आपली सर्व कमाई आहे याची जाणीव त्याला होते. म्हणून त्याची राखण करणाऱ्या शेतकऱ्याचे व्यक्तिचित्रण प्रभावीपणे केलेले आहे.

उदा. ''उन्हं भगटली हुती. गार वाऱ्याच्या झुळका उन झाल्या घर गुदमरायला लागलं हुतं म्हणताना कुशाबा दारातल्या पिपरणीच्या झाडाबुडी बसून उन्हात वाळत घातलेल्या बोटव्याकडे बघत हुता. तापलेली भुई धगीचं फवारं फेकत हुती नि वाळू घातलेल्या बोटव्यांचा खमंग वास सुटला हुता. त्या खमंग वासानं कुशाबाच्या तोंडाला पानी सुटलं हुतं. बोटव उकडून खायची इच्छा झाली हुती.''[१८]

कुशाबा डोईफोडेचे वृध्दत्वाकडे झुकलेल्या शरीराचे वर्णन हुबेहूब केले आहे.

**'घार' (कोंबारा)**

'घार' या कथेतील 'सुमन'ची व्यक्तिरेखा प्रभावीपणे चित्रित केली आहे. सासूपेक्षा सून वरचढ बनते. सासूच्या अंगावरील दागिने आपल्याला कधी मिळतील यासाठी ती सतत प्रयत्न करते. सासूच्या सतत मागे मागे करणारी सून, तर सूनेच्या मनातील उद्देश सासू ओळखते त्यामुळे दोघींच्या मध्ये सतत भांडण जुंपते. घरी सासू नाही असे दिसताच तिचा सोन्याचा दागिना लपवून ठेवते व घारीने सोने पळविले असे खोटेच सांगते. सुनेचे वर्तन पाहून सासू आपल्या मुलीच्या गावी निघून जाते. यदाकदाचित आपली सासू सर्व दागिने आपल्या नंणदेला देईल म्हणून तिला आणण्यासाठी नणंदेच्या सासरी जाते. आपले सर्व दागिने कसे मिळतील म्हणून प्रयत्न करणाऱ्या सूमीचे चित्रण प्रभावी बनते.

उदा. ''सपई आभाळाखाली एक घार तरंगत होती. लांबसडक पंखाच्या छतानं सूर्याची किरणं थोपल्या गेल्यानं तेवढाच सावलीचा बारका ठिपका भुईवर चालल्यासारखं वाटत होतं. सावलीचा ठिपका नजरेला पडला, की उचल म्हंटल्यागत सुमीचं गुंडकं वर होत होत नि तिच्या गोऱ्यापान तोंडावर सुर्याची किरणं वरनं सांडत होती. म्हणताना तिचं गोर तोंड चाकवताच्या कोवळया भाजीच्या सिसंगत लालचुटूक होत होतं''[१९]

सासूच्या दागिन्यासाठी लाळघोट करणाऱ्या व तिच्या मागे-मागे सावलीसारखी वावरणाऱ्या सूमीचे चित्रण या कथेमधून आले आहे.

व्यक्ती चित्रणाबरोबर व्यक्तींच्या स्वभावाचे चित्रण लेखकांनी काही कथांमधून केले असल्याचे दिसून येते. व्यक्तींच्या अंतरंगाचे प्रभावी चित्रण काही कथांमधून अवतरते.

उदा.'जाचणूक', 'झाड बोलतयं', 'वण' यासारख्या कथा होत.

### ❑ प्रसंग चित्रण :-

उत्तम बंडू तुपे यांच्या कथांमधील प्रसंगचित्रणे ग्रामीण जीवनातील एकंदर वास्तव चित्रण साकारतात. असे प्रसंग कथेमध्ये उभे केले आहेत. ग्रामीण जीवनातील सुख-दुःखांच्या प्रसंगांचे आणि घटनेचे चित्रण केले आहे. प्रसंगांमधून कथा नजरेसमोर उभी करण्याचे कौशल्य साधले आहे.

'गुबूगुबू' (आंदण) या कथेतील हा प्रसंग सर्व काही सांगून जातो. 'राजगीरे'नं चंदण्याच्या नंदीला विष पाजल्यानं हत्तीसारखा नंदी जमिनीवर पडून पाय झाडू लागतो. तोंडाला फेस येतो. गारगोटीसारखं डोळं अंधारात चमकू लागतात नंदीचा मृत्यू कशाने झाला? की, कोणी केला या कथेतील हा प्रसंग सर्व काही सांगून जातो. ''चंदन्याचा बा धडपडून उठल्यावर आजूबाजूची पालं हालली. त्या यल्लाच नंदीचं अंग अकसल्यागत झालं. पुन्हीदा एकदा नंदीनं पाय झाडलं नि झोप लागल्यागत नंदी निवांत पसरला. रात्रीच्या अंधारात पांढराफेक डोंगर उठल्यागत नंदी निवांत पसरला नि राजगिरी तिच्या पाळापुढं बसून हासत होती. 'हे कायबी न्हाय, म्हणाव तुझं खवर केल्याबगार मी गप्पं राहणारी नव्हं''[२०]

या प्रसंगावरून नंदीच्या मृत्यूमागे राजगिरीचा हात असल्याचे जाणवते. या एकाच प्रसंगाने नंदीवाल्यांच्या जीवनातील संघर्ष कसा जीवघेणा ठरतो ते समजते.

**'वझ्याखालचं वझं' (आंदण)**

या कथेतील प्रसंगाने कैकाडी जमातीतील 'उमाजीच्या जीवनातील प्रसंग चित्रण केला आहे. उमाजी, भिका सरपंचाच्या जमिनीत आपले कुटुंब व गाढवे घेऊन राबत असतो. गावची जमीन हडप करण्याचे प्रयत्न भिका करतो. तेव्हा गावातील मजूर त्याच्यावर सामूहिक बहिष्कार

टाकतात. त्या गावामध्ये राहणारा उपरा मनुष्य उमाजी गावच्या बाजूने राहतो. त्यामुळे त्याची उपजीविका थांबते. गाढव मरते. अशी अनेक संकटे त्याला जाणवू लागतात. या सर्व संकटांमधून दूर व्हायचे असेल तर आपल्या मुलांनी शिक्षण घेणे गरजेचे आहे, हा विचार त्यांच्या मनात येतो. त्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. आपल्या मुलांना चांगले दिवस यावेत, आपल्यासारखे टाकावू जीवन आपल्या मुलांनी जगू नये, आपली मुले शिक्षणाने संस्कारित व्हावीत म्हणून प्रयत्न करतो. त्याच्या जीवनातील त्या प्रसंगाचे चित्रण केले आहे.

''गंगे, याला निऊन घाल त्या साळत !

कवा तरी त्याचं नीट मार्गी लागंल.'

'अन तुम्ही कुठं जाणार हायसा?'

'तालीचं वजं कोन उचलील? गुण्या गेला-सुटला. आमचा जलम, हयाचं त्याचं काम करायला. अगं कष्टाची माती झाली तरी आपनाला मातीतच कष्ट करायला पायजेत.''[२१]

या प्रसंगामधून शिक्षण घेतल्याने आपल्या मुलांचे जीवन सुखी होईल हा विचार पददलितांच्या, मजूरांच्या जीवनातील शिक्षणाचे महत्त्व प्रकट करतो.

**'कोरडयास' (कोंबारा)**

या कथेतील प्रसंग मातंग समाजातील माणसे कोणत्या निकृष्ट प्रतीच्या अन्नावर आपली उपजीविका करतात व प्रत्येक दिवस कसा निभावून नेतात याची जाणीव होते. तसेच हा प्रसंग लेखकाच्या जीवनावर प्रकाश टाकतो.

''काय उत्तम कसं काय बरं आहे?

'मी लाडल्यासारखा झालो, तवर काका पुढं बोलले.

'काय कोरड्यास केलय? मी गप्प बसायचं ते पटकन बोललो,

'सागुतीचं केलय, घाडगे काका तरातरा आला त्यानं भगुलं बघितलं. दादानं परातीतलं कोरड्यास माझ्या टकूरीवर ओतलं' ही अवलाद मला फासावर दील एकदा कोंडे म्हणून दादानं काठी उचलली.

तसं मी पुणं गाठलं''[२२]

लेखकाच्या जीवनातील हा प्रसंग स्वानुभवाचे चित्रण करणारा आहे. लेखक आणि कुटुंब यांच्यामध्ये दुरावा करणारा हा प्रसंग लेखकाच्या जीवनातील महत्त्वाची घटना आहे.

**'पाल' (आंदण)**

या कथेतील सासू आपल्या सुनेचा छळ कसा करते. तसेच सूनेला शेतातील धन सापडते. याचे श्रेय तिला न देता आपली मुलगी, तारा घरी आल्याने धन सापडले असे ती सर्वांना सांगते.

उदा.- ''आबा! अहिल्याला धन घावलंय.

पैशाचा मोरवा घावलाया'

'आर कुठाय मोरवा'

'बुट्टीत हाय नव्हं का!'

राणू पुढं झाला त्यसानं बुट्टीतला भाजीपाला बगलला सारला त्यात दडवलेला मोरवा उचलला.

'माझी सून पायगुणी? माझी तारा आज आली. घराला पाय लागला. तर हे मातीत दडलेलं धन घावलं![२३]

आनंदाच्या प्रसंगीही आपल्या सूनेला पांढरी पाल म्हणून हिणवणारी सासू या प्रसंगातून चित्रित केली आहे.

**'जग' (आंदण)**

या कथेतील प्रसंग चित्रण एवढे प्रत्ययकारी झाले आहे की देवदासीवर होणाऱ्या अत्याचाराचे, अन्यायाचे, बळी गेलेल्या देवदासीचे या प्रसंगातून स्वरूप लक्षात येते.

''बोलता-बोलता दोन कासरं रान तुटलं नि 'खींळा'ची हीर जवळ आली. वड लागल्यागत राधा वढत निघाली. हिरीच्या बगलंतली वाट जिती झाली. दोन हेडी दोन अंगानं आलं. मूठभर नोटा येलूच्या हातात पडल्या नि जग राधाच्या टक्कुरीवरून ढासळला. देवाचं मुखोटं, टाक मरून पडल्यागत धुळीत पडलं. जगाचा कूड मोडून जग वाकडा-तिकडा झाला. उतारानं घरंगळत लांब लांब पळाला. कवड्यांच्या माळा तुटून पडल्या नि उन्हाच्या रखरखीत सगळं धडपडलं 'आये, काय गं हे, काय केलं?''[२४]

देवदासींच्या जीवनाचा शेवट कशा प्रकारे होतो. जीवन म्हणून त्यांच्या जीवनात काही शिल्लक राहते का? स्वतःची आई पोटच्या गोळयाला हेडयांच्या हवाली करते व मिळणाऱ्या पैशावर आपले जीवन जगण्याचा प्रयत्न करते. आपण ज्या प्रकारे वागले त्याचप्रकारे आपल्या मुलीची जीवनाच्या बाजारात विक्री करून आनंद मानणारी एक देवदासी – तिच्या जीवनातील प्रसंग हादरून सोडणारा असा आहे.

**'रेडंजत्रा' (आंदण)**

या प्रसंगामधून ग्रामीण भागातील जत्रांच्या निमत्तानं पशुहत्या कशा प्रकारे केली जाते याचे प्रसंगचित्रण प्रभावीपणे मांडले आहे.

देवीला रेडयाचा बळी देण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली. त्यातून शक्तिप्रदर्शन, मानकरी, सुहासिनीचा मान व त्यातून निर्माण होणारा संघर्ष, रेडयाची मान एका घावात तुटली नाही तर कोणता अनर्थ ओढवेल अशाप्रकारची अंधश्रध्दा या प्रसंगामधून येते.

''हळूच म्हंकाळ पुढं आला त्याच्या डोळयात वीज चमकून गेली. कुनाला दिसली, कुणाला दिसली नाय. पर उत्तम रामोशानं मातर कंबार बांधली. त्यानं म्हंकाळनं केलेला इशारा उरात बांधला. मानकरणीच्या दंडाला धरून रेडयाजवळ नेली. आपून रेडयाच्या मागच्या बाजूला झाला. त्यानं रेडयाचं मागचं पाय धरून रेडा वढला. तसा आवसान तुटलेला रेडा खाली पडला.''[२५]

सुहासिनीने रेडयाची मान तोडायची प्रथा उत्तम रामोशी मोडीत काढतो. देवीच्या समोर दिल्या जाणाऱ्या रेडयाच्या बळीचे चित्रण त्या प्रसंगातील क्रूरपणाची जाणीव करून देतो.

उत्तम बंडू तुपे यांच्या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणे व प्रसंगचित्रणे मांडत असताना व्यक्ती असो, व्यक्तीचा विशिष्ट भावक्षण असो, प्रसंग असो वा निसर्ग त्याचे हुबेहुब यथार्थ वर्णन ते करतात. प्रतीक-प्रतिमांच्या साह्याने ते रंगवितात. कथेच्या वातावरणात गेल्यावर कथेतील व्यक्तीच्या मनाचे सूक्ष्मपदर सहजपणे उलगडतात.

**❑ भाषाशैली :-**

**❑ उत्तम बंडू तुपे यांच्या कथासंग्रहातील भाषाशैली :-**

'आंदण' व 'कोंबारा' या दोन्ही कथासंग्रहातील उत्तम बंडू तुपे यांची भाषा ही 'सातारा' परिसरातील बोली भाषा आढळते. अजून तरी ती शैलीच्या मोहात पडलेली नाही. त्यांच्या भाषाशैलीविषयी 'अनिल बळेल' म्हणतात ''उत्तमची भाषा ही उत्तमचीच भाषा आहे. अजून तरी ती शैलीच्या मोहात पडलेली नाही. पण या सुसाट लेखनाला कुठे तरी, अंकुश हवा. या सुसाट लेखनाला अपघात होण्यापूर्वी कुणी तरी भानावर आणावे असे उत्तमला स्वतःलाही वाटते. तसा

टीकाकार त्याला लाभायला हवा.''[२६]

त्यांनी लिहिलेले दोन कथासंग्रह अस्सल ग्रामीण बोलीमध्ये आहेत. ग्रामीण कथेशी नाते सांगायचे झाल्यास त्याची जी भाषा असेल त्याच बोलीभाषेत सांगितले तर ते अधिक योग्य वाटते. नाहीपेक्षा शोभेच्या फुलाचे असते तसेच भाषेचे होते. त्यामध्ये जिवंतपणा नसतो. ग्रामीण बोलीविषयी 'आनंद यादव' म्हणतात ''कोणत्याही साहित्याचे मूल्य हे त्या साहित्यातील जीवन, त्या साहित्यातील भाषा प्रत्यक्ष अस्तित्वात आहे की नाही यावर अवलंबून नसून, त्या साहित्यातून त्या भाषेच्या द्वारा जो एकूण मानवी मनाचा पट उलगडलेला असतो, जी त्या मनाची मूलभूत स्पंदने तिथे आविष्कृत झालेली असतात यावर असते.''[२७]

ग्रामीण लेखनात निवेदनाची भाषा कोणती असावी याविषयी 'श्रीराम गुंदेकर म्हणतात – ''अनुभवाची अभिव्यक्ती करण्यासाठी लेखकाला जी भाषा अपरिहार्य वाटते ती त्याने वापरावी. त्या भाषेत त्याची नैसर्गिक आणि स्वाभाविक रीतीने अभिव्यक्ती होऊ शकते.''[२८]

या दृष्टीने बघितले तर बोलीभाषा या खेड्यातील संस्कृतीचे निदर्शकच असतात. गुंदेकर यांचे हे मत ग्रामीणतेचा सांधा जोडण्यास योग्यच वाटते.

भाषाशैलीचा विचार करता त्यांच्या कथासंग्रहात 'सातारा' परिसरातील ग्रामीण बोली जाणवते. ज्या परिसरातील बोलीभाषा आहे त्या बोलीत कथासंग्रह लिहिण्याचा उद्देश असाच आहे, की सर्वसामान्यांच्या मुखातून बाहेर पडणारी ही बोली त्यांच्याच सुख-दुःखाचे चित्रण त्यांच्याच बोलीत केले तर ते प्रत्ययकारी होईल. याविषयीचे आपले मत मांडताना आनंद यादव म्हणतात – ''साहित्य कला-निर्मितीशी जेव्हा कोणीतीही भाषा निगडित होते तेव्हा ती 'सामाजिक व्यवहाराचे साधन' राहत नसून कलामाध्यमाचे रूप घेत असते. त्यावेळी तिचा 'एक निर्मिती माध्यम' म्हणून विचार करावा लागतो.''[२९]

ग्रामीण कथा वाङ्मयात भाषेला अतिशय महत्त्व आहे. ग्रामीण समाजाची इतर भाषेच्या लोकांबरोबर असलेली देवघेव यामुळे भाषेत नकळत परभाषीय शब्दांचा उल्लेख आढळतो व ते नेहमीच्या सवयीने व्यवहारात रूढ होतात. त्यांचा परकेपणा जाणवत नाही.

उत्तम तुपे यांनी ग्रामीण बोलीभाषेचा वापर करून 'आंदण' व 'कोंबारा' कथासंग्रहांची मांडणी केली. 'सातारा' बोलीभाषेचा ठसकेपणा आणि त्या भाषेत असलेल्या अंगभूत वैशिष्ट्यांसह ती भाषा कथेतून आली आहे. बोलीभाषेत संवाद आल्यामुळे व्यक्ती, प्रसंग, घटना यांचे वास्तव रूप धारण करते. संवादासाठी बोलीभाषेचा वापर केल्याचे जाणवते. 'हौसा' व बाबल्याचे संवाद जसेच्या तसे दिले आहेत. 'आंदण' (आंदण)

उदा. ''आये, मी तगई काढतोय',

'मग काढ की. काय हुयाचं आसल ते हुंदे आसं लोकांची तोंड बघत बसण्यापेक्षा सवताचा ड्राग हुतोय हे काय कमी नव्हं हिर पाडा.''[३०]

या संवादामधून स्वतःची शेती ओलिताखाली आणण्यासाठी 'बाबल्या' आपल्या आईची संमती घेतो व त्याप्रमाणे जिल्हा परिषदेकडून अनुदान घेऊन विहिरीचे काम पूर्ण करतो हा दोघांमधील संवाद उठावदार वाटतो.

सातारा बोलीभाषेत पात्रांच्या तोंडचे संवाद वापरल्याने व्यक्तिचित्रण जिवंत तर ठरतेच त्याबरोबरच पात्रांच्या मनाचे व स्वभावाचे दर्शन 'कज्या नंदिवाल्याची बायको आपली मुलगी 'राजगीरे' हिला समजावण्याचा प्रयत्न करते. 'गुबूगुबू' (आंदण)

उदा. 'राजगीरे! आसं नगं करू गा, त्येनं न्हाय पत्करलं तुला. आपून दुसरं घर बघू. आपला देव वंगाळ. देवालं असं भंडवू नको. त्यो वैऱ्याचं नि आपलबी खवर करील बरं.

'न्हाय मामी, मी त्येला मी सुखानं जगू देणार नाही. त्येनं माव्हं हासं चार चौघात केलय बा. मी त्येला तसा सोडणार न्हाय. आपले जमातील्हे बी त्येनं मानलं न्हाय बा!''[३१]

दहिवडीच्या माळावर उतरलेली पाले व त्या पालातील 'कज्या नंदीवाले' याची बायको व मुलगी 'राजगीरे' या दोन स्त्रियांमधील संवाद नंदीवाल्यांच्या बोलीभाषेचा अनोखा नमुना विशद करतो.

**'गुळव्या' (कोंबारा)**

सुधारित तत्त्वज्ञानाने कृषी विकासाल गती आली उघडया बोडक्या-माळावर मोटेऐवजी इंजिने पाणी फेकू लागली. रासायनिक खतं आली, उसाची नवी बियाणं आली. किसन काळेच्या शेतात उसाचे भरघोस पीक आलं. त्याच्या मालकीची गुऱ्हाळघरं गजबजून जायला लागली हे वर्षान-वर्षे चालत होतं. त्या गुऱ्हाळ घरावर वर्षाची कमाई करून किसन बायकापोरांना सुखात पोसायचा.

एक वर्षी गुऱ्हाळं सुरू झाले नाही. रोजगारावर जगणाऱ्या म्हंकाळाच्या मनात घालमेल सुरू झाली. त्याची उपासमार सुरू झाली म्हणून तो किसन काळेना विचारतो -

उदा. ''किसण आण्णा! आवं गुऱ्हाळाची कायबी तयारी नस्ता उसाला तोडा कसा लावला?

'म्हंकाळ, आरं हयो सगळा उस तिकडं मोठया गुऱ्हाळावर जाणार हाय!'

'कुठं?'

'फलटणला. साखर कारखान्यावर सगळा ऊस जाणार हाय ही गुऱ्हाळाची कटकट नकू वाटाय लागली.''[३२]

गुऱ्हाळं घर सुरू होणार नाही समजताच त्याच्यापुढे संकट उभे राहते. सुधारलेल्या युगात घेतलेला हा परंपरागत कष्टकऱ्याचा निष्पाप बळी काळाच्या ओघात अपरिहार्यपणे यापुढेही पडत राहील, हे ही एक चिरंतन सत्य आहे. याची जाणीव या संवादामध्ये प्रकट झाली आहे.

आजच्या 'हुंडा' पद्धतीने कसे रौद्र रूप धारण केले आहे त्यासाठी एक गरीब मजूर स्वतःचे रक्त विकून आपल्या मुलीचे लग्न कसे उरकू पाहतो याचे दर्शन या संवादामधून घडते. 'हुंडा' (आंदण) उदा. " हे पाहा, तीन-चार बाटल्या रक्त लागणार आहे. येथे रक्तपेढया नाहीत. शहरात आहेत. या परक्या माणसाचं रक्त काढायचं म्हणजे जबाबदारी कोण घेणार? तेव्हा या माणसाला हजार रुपये द्या डॉक्टर म्हणाले.

'कसं नामी बोललास डागदारसाहेब' जिवबा.

'ठीक देतो आमी.

'तसं न्हाय. आदी रुपय द्या माझ्या हातात. त्या बगार मी रगत देणार नाही.

त्यानं शंभराच्या धा नोटा डॉक्टराच्या हवाली केल्या. डॉक्टरानं जिवबाजवळ हवाली केल्या. जिवबा खाटेवर झोपला. रक्त तपासलं. जुळतय म्हणताना डॉक्टरनं सुई लावली. एक फुगा जिवबाच्या हातात दिला. नि दाबाय सांगितलं. दूध पिळल्यागत लाल रगताची धार बाटलीत पडाय लागली."[३३]

ग्रामीण भागातील स्त्रीची चूक नसताना तिला कोणत्या समस्येला सामोरे जावे लागते, खरे पाहता ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टराकडून चूक होते त्याचा परिणाम 'सपना' वर होतो. याचे दर्शन 'गेणू' व 'सपना' या दोघांच्या संवादामधून घडते.

'चूक कुणाची' (आंदण)

उदा. ''सपने, सांग कुठं शेन खाल्लं?

'न्हाय, न्हाय तुमच्या पाय पडते. मला मारू नका हात जोडती.

'मला नगं. हया पोटातल्या बापाला हात जोड'

'हे तुमचं हाय.'

'म्या कापून घिट्लय''[३४]

तपासणी झाल्यानंतर ऑपरेशनातील चूक लक्षात येते. नंतरची परिस्थिती कशी निवळते ते या संवादातून प्रकट होते. तसेच नवऱ्याने बायकोवर शंका घेतल्याचे जाणवते.

दुसऱ्याच्या शेतीवर मजुरी करून आपली मुले मोठी करणाऱ्या 'मूल' व 'गोजा' या दांपत्याने आपले वडिलाचे कर्तव्य पार पाडले. पण तिच मुले मोठेपणी आपला वेगळा संसार थाटतात. मलू व गोजाला म्हातारपणातही ढोरकष्ट करावेच लागते. आपल्या मुलांची मनिऑर्डरची वाट पाहणाऱ्या मजुरांचा संवाद बोलका वाटतो. 'खोपा' (आंदण)

उदा. '' 'रामारामा, हरी इठ्ठला! जीव कटाळून गेला बग'

'उठा, चूळ भरा वाईच भाकरी खावा, अन माझं हात चोळा'

'का, काय झालं तुझ्या हाताला

'भांगलून भांगलून मनगट दुखाय लागलेती.'

'माझीबी तिच गत झालीय, हाड न हाड दुखतय माझं. आसं कर, मी मनगट चोळतो. मग मी पालता पडतो. नाच माझ्या अंगावर वरूटयानं चेच, पोरांचा काय कागुद पतुर?

'न्हाय, काय न्हाय'

'कशाला धाडतेली गं, आयबाप हिकडं मरून पडलं तरी त्यांचं डोळं उघडाचं न्हायत...'

'आसं कसं? त्यास्नी काय काळीज न्हाय का'

'त्यांच्या पोटात काळीज असतं तर वाईच तरी हाललं असतं. हे आता कष्ट करून खायचं वय हाय का.''[३५]

आपली शेती आधुनिक तंत्राने करण्याचे ध्येय व उसाचे घेतलेले पीकं त्याचे स्वतःच गाळप करण्याचे स्वप्न 'सीताराम'च्या संवादातून प्रकट होते. 'कोंबारा' (कोंबारा)

''सीताराम, आता उस कारखान्याला जाणार तर?

'न्हाय कारभारी घरीच गाळणार'

'मजी गुराळ करणार म्हण की?

'कारभारी, बघा तर खरं मी माझ्या शिक्षणाचा कसा उपयोग करतो.''[३६]

'सखू'ला पहिल्या नवऱ्याने सोडचिठ्ठी दिल्याने तिचा दुसरा विवाह केला जातो. ती नव्या संसारात पदार्पण करते. तेव्हा तिला दिसून येते, की आपल्या आयुष्याचा 'वणवा' संपला नाही.तिची महत्त्वकांक्षा संपते. तिला दुसऱ्या नवऱ्याच्या घरी सासू कजाक भेटते याचा प्रत्यय या संवादामधून घडतो. 'वणवा' (कोंबारा)

उदा. '' हे हं कसं घासलय. हयाचं काळं तरी निघालय?

'तुझ्या आयनं काय शिकवलय गं'

तवा शेजारी बोलायच्या.....

'काय हो सुनला गांजताय'

'हे बघा तिनं भांडी घासत्यात!'

' आणखी कसली घासायची? चांगली झकपक निघाल्यात की'

'माझ्या लेकी कसं घासल्यात'

'त्यास्नी ठावं हाय. धुण्या-भांडयाची कामं करत्यात नव्हं'

शेजारी बोलायचं नि तिची सासू आणखी तिला गांजायची.

'घरांतलं बाहेर सांगतीस' ''[३७]

'रानू' व 'कला' यांचा विवाह होतो ते एकमेकावर जीवापाड प्रेम करतात. पण रानूच्या वडिलांना हुंडयाचा हव्यास असल्याने 'कलाचा दोष नसताना काहीतरी कारण पुढे करून तिला माहेरी पाठविली जाते. काही दिवस रानू वाट पाहतो व आपल्या पत्नीला आणण्यासाठी डांबावाडीला' जातो. या ठिकाणचा संवाद बोलका वाटतो.

'घडी' (कोंबारा)

उदा.-

''तुझा बाप गं'

'तुमचीच वाट बघत्यात'

दोघं बोलत होती तवर कलाचा बाप पुढं आला त्यानं रानूच्या हाताला धरलं

'पावनं चला की, घराकडं. पाहुण्यानं आसं उभ्याउभ्या येऊन जानं बरं नव्हं'

'मी कलाला नियाला आलुया'

'तुमचा ऐवज तुम्ही घेऊन जा. आन या घडीची वाट आमीबी बघत हुतो''[३८]

'जाई' चे लग्न होऊन तीन-चार वर्षांचा काळ सरला. पण तिला मुल होत नाही. वैद्यकीय उपायापेक्षा देवाला नवस केल्याने आपल्या सुनेला मुलं होतील तिचं वांझपण दूर सरेल म्हणून आपल्या सुनेचा छळ मांडते. पण जाईचा नवरा 'किसन' डॉक्टरांचा सल्ला घेतो. त्यामुळे जाई गरोदर राहते. हा प्रसंग 'मजूर स्त्रिया' व 'जाई' यांच्या संवादावरून आढळतो.

'झाड बोलतय' (कोंबारा)

उदा. – ''जाई चोरून खाल्लंस, पर आमी हेरलं'

जाई, हासली मनात लाजली.

'ते खरं ग, पर गुण कुणी दिला? भगतानं का...?

त्यांच्यातली एक जण बोलली नि हीर भडाडली.

'बयानू भगत खोटा. त्याचा देव खोटा, देवाचं सत्व, तत्त्व खोटं, भगत खोटा – पोटासाठी सोंग करणारा'.....

'हे तू बोलावं, भगता?'

'न्हाय न्हाय, मी देवाचं झाड बोलतयं मनातलं खरं भडाभडा सांडतय''[३९]

उत्तम बंडू तुपे यांना ग्रामीण वास्तवाचे चांगले आकलन आहे. हे त्यांच्या

कथासंग्रहातील बोलीच्या अस्सलपणावरून दिसून येते. त्या योगाने येणाऱ्या म्हणी यांचा वापर ठसठशीतपणे केला आहे.

उदा. –

" 'तरूणपण आसं तसं गेलं, हाती कोळसं आलं.'

'सुख सांगावं जनाला, नी दुःख सांगावं मनाला'

'म्हातारी, म्हातारी उडदाची डाळ, म्हातारी झाली नेणतं बाळ.'

'खाल मुंडी, गाव धुंडी'

'नवऱ्या आड शिंदळकी, आन शेताआड चोरी'

'वढून काढावं, तर बोट तुटतय नि दार काढावं, तर घर उघडं पडतय.'

उत्तम बंडू तुपे यांनी कथासंग्रहात केलेल्या म्हणींच्या वापराने व त्या म्हणी बोली भाषेत असल्याने जिवंतपणा आला आहे. प्रसंग हुबेहूब करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे.

तुपेंनी आपल्या कथासंग्रहांमधून कथांचा आशयानुरूप प्रतीकांचा आणि प्रतिमांचा वापर बोलीला धरून केला. त्या-त्या ग्रामीण परिसरातील प्रतिमा परिणामकारक आहेत.

उदा.

" 'वरनं तापत आलेली किरनं झळझळून पिकल्या पपईत विळा घातल्यागत खसाखसा आत शिरून आतलं रगत पिल्यागत ओलावा पीत होती.'

'पाण्याच्या लाटा विहिरीच्या तटाला सपा सपा आपटल्या तवा गालावर तडातडा

वादाडं हाणल्यागत वाटलं.'

'वाळल्या गवताच्या पेंढीत हात घालून हालवल्यागत – कुशाबानं वाढलेल्या टक्कूरीत हात घातला'

'खडकातनं पाणी पाझरावं, तसं अंगातनं घाम पाझरत होता.'

'रानं राघूच्या पंखागत हिरवीचार ठिवाय लागतेली'

'नवतीची रत्ना भराला आलेल्या लिंबोणीच्या झाडागत रसरसीत दिसत होती'

'गावच्या एका अंगाला लुतभऱ्या कुत्र्यागत रान पाझरलं होतं'

'शेमडाची तार लागल्यागत विहिरीच्या बरगडीतनं रक्तागत पाण्याच्या धारा पाझरत होत्या.'

'भूत उठल्यागत सावल्या लांब होत होत्या'

'सीतारामची इगत कोंबाऱ्यागत नवी दृष्टी देत होती.''

ग्रामीण शैलीचा वापर करण्याचे सामर्थ्य अगदी यथार्थपणे लिखानामधून दिसून येते. ग्रामीण समाजात श्रमाची कामे केल्याने आलेला कंटाळा घालविण्यासाठी जसं मोटवरचं गाणं म्हटलं जातं त्याचप्रकारे गुऱ्हाळघर सुरू असताना दमदारपणे चालेला किरचल या किरचलाच्या घुंगराच्या तालावर गाणे म्हंटले जाते. बाबल्या किरचाल चालल्याची कल्पना करतो.

उदा.

'वाटच्या वाटसरा

काय बघतो वारा दुरा

उभं शिवार सोन्यावानी

हिर भरली थिरा थिरा।

वाटच्या रे वाटसरा

काम करते ऊठ बस!

दोन बैलांच्या जिवावरी

दारी सुवर्णाची रास।

गुऱ्हाळावर म्हटले जाणारे गीत शेतकऱ्याच्या जीवनातील आनंदाचे प्रतीक आहे. तसेच भरला शिवार डोळ्यासमोर उभा राहतो. बैलांनी केलेल्या कष्टाचे मोल धनाच्या रुपानं शेतकऱ्याच्या घरी येते. या गीतातून ग्रामीण परिसराचे दर्शन घडते.

नवऱ्याचा मृत्यू झाल्याने त्याचं आवडतं वाद्य 'तारा' झंकारत असल्याची जाणीव 'शालू'ला होते. 'तारा' झंकारत राहतो. ताऱ्याच्या झंकारात आपला सूर मिसळून शालू अभंग म्हणते.

उदा. – 'एकतारी' (कोंबारा)

'सुस्वरूप गा कुरूप

हा खेळ नजरेचा

फाडून बघा, मग, दिसल अंतरी

झरा अमृताचा!"

प्रत्येक लेखकाची स्वतःची अशी एक खास शैली असते आणि त्या शैलीवरून तो लेखक ओळखला जातो. त्याप्रमाणे तुपे यांच्या कथेत वाक्यरचना जरी साधारण प्रतीची असली, तरी ग्रामीण आशय अभिव्यक्त करण्याची भराभरी अमोघ आहे. त्यामुळे भाषेत जिवंतपणा अवतरला आहे. तुपे यांच्या कथा ग्रामीण जीवनाचे प्रत्यकारी रूप घेऊन अवतरत असल्याने तेथील गुणासह प्रकट झाले आहेत. संवादातील शब्दांची फेक सहजतेने आल्याने कृत्रिमतेपासून कथा दूर राहते.

कथेतून सातारा व आजूबाजूचा परिसर व भाषेतील म्हणी आलेल्या आहेत. तसेच कथेमधून काव्यात्मकता हा गुण जाणवतो. एकंदर संस्कृतीचे व जीवनाचे बोलीशी असणारे नाते गुणासह प्रकट झाले आहे.

कथेतील बोलीचा वापर ओढून-ताणून केल्याचे दिसत नाही. किंवा तिचा वापर एखाद्या कथावस्तूसारखा न करता त्या भाषेतील सौंदर्य आणि जिवंतपणासह बोली कथेत आणली आहे. बोलीभाषेला प्रमाण भाषेचे, व्याकरणाचे तंतोतंत नियम लावून पारखता येत नाही तर ती ओघानेच आलेली असते.

उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतून येणारी नावेसुद्धा ग्रामीणतेशी नाते सांगणारी आहेत.

उदा. "बबन्या, मलू, रानबा, वाली, धुरपा, सखू, दामू, सगुणा, जिजाबा, गेणू, जानकी"

इत्यादी नावे ग्रामीण बोलीतील एक नमुनाच आहे.

कथेचा आशय परिणामकारक होण्यासाठी आवाजही जसेच्या तसे आले आहेत. या कथेमधून येणाऱ्या आवाजामुळे एकप्रकारची नादमयता, लयबद्धता साधली आहे.

उदा.

" 'त्येची रेडी चावडीकडं बघून

राँय, राँय ओरडत होती'

'कुत्र्यांचा आवाज भोऽऽ भोऽऽ'

'शेळी बाऽऽ बाऽऽ करून ओरडायची'

'वाऱ्याचा गुं गुऽऽ गुं आवाज.'

'बाळीनं (गाय) मागं फिरून बघितलं

हंऽऽबा करून हंबरली.'

'जिजाबा 'फ्या-फ्या घ्या करत उठले.'

'घुबडाचा 'घूऽऽ घू ऽऽ असा धूतकार'

'टिटवीचे - टी, टी टिटीवऽऽ टी' ओरडणे.

ग्रामीण भागातील शिक्षणाच्या सुविधांमुळे आणि इतर परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील जनता आपल्या बोलीभाषेत इंग्रजी शब्दाचा वापर सहजतेने करताना दिसतात. अशा प्रकारचा वापर उत्तम तुपे करत असल्याचे जाणवते.

उदा.-

'बी.एस्.सी.ॲग्री, डॉक्टर,

बोरिंग, टेंपो, आय.सी.एस्,

नर्स, पंप, टाईम.

इत्यादी शब्दांना बोलीच्या वापरात आलेले महत्त्व व त्याचे वळण दाखविले आहे.

ग्रामीण बोलीभाषेचा वापर हा ग्रामीण वास्तव रूप धारण करणाऱ्या कथांमधून अनिवार्य ठरतो. लेखकाच्या त्या अनुभवाशी स्व-अनुभव असेल किंवा थेट संबंध असेल तर लिहिताना तीच भाषा स्फुरत जाते. तसे पाहता ही भाषा त्याला बदलता येते.

सारांश उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतील आशयसूत्रे, व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण, भाषाशैली व कथांची वैशिष्ट्ये पाहत असताना उत्तम तुपेंना ग्रामीण वास्तवाची प्रगल्भ जाणीव हा त्यांच्या कथेचा स्थायिभाव असल्याचे जाणवते. आशयसूत्रांच्या बाबतीत त्यांच्या कथा ग्रामीण जाणिवा व्यक्त करणाऱ्या ठरतात. व्यक्तीचित्रांची वैशिष्ट्ये पाहता ते आपल्या कथामधून व्यक्तीच्या बाहयांगाबरोबरच अंतरंगाचे चित्रण करतात व त्यातून व्यक्तीच्या मनाचे आणि स्वभावाचे दर्शन घडते. कथेतील व्यक्ती, प्रतिमातून, प्रतिकातून व संवादातून साकारताना दिसतात. व्यक्तीच्या जीवनातील सुख-दुःखाचे, रागालोभाचे, जसे प्रसंग येतात तसे व्यथा-वेदना, हळवेपणा, स्वप्नाळूपणा कष्टाळूवृत्ती येते. प्रसंगचित्रणातून वास्तवरूप दाखविले आहे. व्यक्ती, प्रसंग, घटना त्यातून ग्रामीण परिसराचे चित्रण करण्याचे कौशल्य कौतुकास्पद आहे.

भाषाशैलीच्या बाबतीत तुपे यांनी ग्रामीण भाषेच्या लकबी कौशल्याने हाताळल्या आहेत. बोलीतील गुण कथेमधून दिसतात. सातारीबोली, म्हणी, नादमयता यामुळे कथा जिवंतपणाची जाणीव करून देत असल्याची जाणीव होते.

**❑ उत्तम बंडू तुपे यांच्या कथालेखनाची वैशिष्टये :-**

उत्तम बंडू तुपे यांची लेखनशैली कशी आहे हे त्यांच्या कथामधील व्यक्तिवर्णनातून, प्रसंगवर्णनातून प्रकट होते. ग्रामीण जीवनातील शेतकरी, स्त्रिया, सालगडी, भटक्या जाती यांच्या

जीवनातील दुःख, समस्या स्वतः लेखकांनी अनुभवल्या आहेत. त्यामुळे स्वानुभवातील प्रसंग मांडताना त्यातील तन्मयता प्रकट होते. त्यामुळेच आपल्याला दिसलेले प्रसंग व व्यक्ती परिणामकारकपणे वाचकांच्या मनावर ठसविण्याची जबाबदारी स्वतः लेखक स्वीकारत असल्याचे दिसते.

अज्ञान, अंधश्रध्दा, अमानुष प्रथांचे भीतीपोटी होणारे पालन, आर्थिक दारिद्रय व त्यामधूनच येणारे मानसिक दारिद्रय, आला भोग निमूटपणे स्वीकारण्याची व सहन करण्याची अगतिक वृत्ती अशा संपूर्ण उपेक्षित अवस्थेत जगणारी माणसे तुपे यांना लहानपणापासूनच भेटली होती. गरिबीने गांजलेल्या, दुबळया माणसांच्यावर विदारक प्रकाश टाकला आहे. अशा माणसांच्या जीवनाचे व कुटुंबाचे पापुद्रे तुपेंनी हळूवारपणे उलगडून दाखविले आहेत.

ग्रामीण जीवनातील ग्रामीणत्व, प्रक्षोभ चवचालपणा यांच्या आहारी न जाता अत्यंत सौम्यपणे कथांची मांडणी करून लेखक एक करूणरम्य वाट चोखाळत जातात. त्यांच्या कथाविश्वात ग्रामीण जीवनातील दुःखेच अधिकतर जोपासली आहेत. त्यांची पात्रे संयमाने जीवन जगतात प्राचीन ग्रामीण संकेत, रूढी व नव्या पिढीची मानसिक घडण यामधून फारसा संघर्ष होत नाही. कथेतील पात्रे आवर्तात सापडल्याने व्याकूळ वाटतात. ग्रामीण समाजजीवनापेक्षा तेथील व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील सुख-दुःखाचे हळवे आणि तीव्र स्वर लेखकांनी अस्सलपणे आपल्या कथामध्ये कोरले. आहेत. त्यांची आशयसूत्रे, व्यक्तीचित्रण प्रसंगचित्रण, भाषाशैली यावर पूर्वासुरीचे संस्कार जरी जाणवत असले तरी त्यांची स्वतंत्र अशी लेखनशैली आहे, याची जाणीव होते. उत्तम बंडू तुपे यांच्या कथालेखनाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) ग्रामीण वास्तव :-**

कोणत्याही लेखनाचा विचार करत असताना लेखक जे जीवन कथेमधून आकार करणार आहे. त्या जीवनाचे ज्ञान लेखकाला असणे गरजेचे असते. ग्रामीण कथेच्या बाबतीत हे

महत्त्वाचे वाटते व्यक्तीचित्रणामध्ये जो बारकावा, रेखीवपणा व ठसठशीतपणा असतो, त्यामुळे त्या व्यक्तिचित्रांची उंची व दिमाख विशेषत्वाने डोळयात भरतात. बऱ्याच कथांना वास्तवाची पार्श्वभूमी लाभली असल्याने कथातील व्यक्तिरेखा ग्रामीणतेचा बाज घेऊन अवतरतात. ग्रामीण संस्कृती, परिसर, वातावरण यांचे काळानुसार परिवर्तन झाले असता त्याचे वास्तव ज्ञान ग्रामीण कथाकाराला असणे गरजेचे असते असे ज्ञान असेल तरच ग्रामीण जीवन कथेमधून योग्य धाटणीने मांडता येईल. 'आंदण' व 'कोंबारा' या कथासंग्रहामध्ये तुपेना ग्रामीण वास्तवाचे ज्ञान असल्याचे जाणवते.

ग्रामीण जीवनातील सण, उत्सवांना असणारे महत्त्व 'रेंडजत्रा' (आंदण) या कथेमधून दिसून येते. ही कथा ग्रामीण भागातील जत्रा व जत्रेच्या निमित्तानं उपस्थित असणारे मानकरी, मानासाठी चाललेले शक्तिप्रदर्शन यांचे वास्तव चित्रण करणारी आहे.

**२) समूह जीवन :-**

ग्रामीण माणूस हा रूढीचे पालन करणारा असतो. परंपरेनुसार चालत आलेल्या आचार-विचारांनी बांधला जातो. त्याचे मन आणि रूढी यातून काही समज निर्माण होतात. यामधूनच ग्रामीण माणसाच्या समूहजीवनाची तयारी होते. याचा प्रत्यय 'वझ्याखालचं वझं'(कोंबारा) या कथेमधून येतो. 'नरायण' गावचा सरपंच भिका पाटील गावची चवथाई खरेदी करून एक भारदस्त बंगला बांधतो. विहिरीवर पंप बसवितो त्याचे गावावरचे वर्चस्व व गावची जमीन हडप करण्याची प्रवृत्ती पाहून त्याच्यावर सामूहिक बहिष्कार टाकतात. या घटनेवरून समूह जीवनाचे दर्शन घडते. समूहात राहणारी माणसे धनदांडग्या माणसालासुध्दा कशाप्रकारे वटणीवर आणू शकतात या प्रसंगातून महत्त्वाचे वाटते.

**३) अंधश्रध्दा :-**

सरकारी नियमांचे बंधन एकवेळ खेडूत पाळणार नाही, पण प्रचलित धर्मकल्पना,

पारलौकिक जीवनाबद्दलच्या कल्पना, देव, दैवते यांच्यावर असणारी श्रध्दा व समजुती, प्रथा, मानापमान, यांची बंधने त्यांच्या जीवनावर मोठेच नियंत्रण करीत असतात. उत्तम तुपे यांच्या कथांमधून कांही अंधश्रध्दा आल्याचे जाणवते.

उदा. 'पाल'(आंदण) कथा अंधश्रध्देचा बळी ठरलेल्या 'जानकी'चे चित्रण करते. जानकीला विंचू चावतो. यामध्ये अहिल्याचा काही दोष असत नाही. पण जानकीची अंधश्रध्दा असते की, आपली सून (अहिल्या) म्हणजे घरात घुसलेली पांढरी पाल आहे. तिचं आपल्या घरी येणं म्हणजे आपल्या घराचा खेळ होणं आहे. असं जानकीस वाटत राहते. सर्प चावून म्हैस मरते पण या घटनेमागे आपल्या सुनेचा पायगुणच कारणीभूत आहे असे तिला सतत वाटत राहते.

''बया, बया! ही पांढरी पाल आली तवापस्नं घराचा हयो खेळ चाललाय ही पाल लवकर घालवाय पायजी न्हायतर घरबुडी हुणार'

या संवादामधून जानकीला मनावर अंधश्रध्देचा पगडा किती आहे. याची कल्पना या कथेमधून येते.

'शिसारी' (आंदण) ही कथा अंधश्रध्देचा बळी ठरलेल्या 'धुरपा' चे चित्रण करते नेवर्तीचे लग्न होऊन 'वेणू' त्याच्या जीवनात येते. दोघांचा संसार सुखी आहे. तसे या दोघांनाही मुले लवकर व्हावीत असे वाटत नाही. पण इतर स्त्रियांच्या बोलण्यावरून आपली सून लेकुरवाळी व्हायची असेल तर देवाला नवस बोलले पाहिजे या दृष्टीने ती सतत प्रयत्न करते. एक दिवस जोगवा मागण्यासाठी आलेली भागी जोगतीण धुरपाला सांगते ''धुरपा तू बी अशी खुळयागत करायली लागली ते

'काय वं झालं भागी'

'मला इचार अजून. सुनेला तिकडं मावलांच्या मेळयात घाल नि तू निवांत डोळं उघडं ठेवून बस कसा

वंस वाढायचा गं? त्यात आज पुनव हाय नव्हं का!''

असे सांगून भागी धुरपाला संध्याकाळी देव्हाऱ्यावर घेऊ न ये म्हणून सांगते या संवादामधून ग्रामीण भागातील स्त्रियांमधील अंधश्रध्दा जाणवते

'वाली' (कोंबारा)

या कथेमधून 'वाली' आपला नवरा 'किसना' आजारी असताना पहिला उपाय म्हणून देवाला नवस बोलते.

''देवा! मलूराजा हेस्नी उठाव चंग्या घोडयागत हुंदे. तुला घोडा वाहीन.''

ग्रामीण भागातील आजची स्त्रीसुध्दा अशा बऱ्याच अंधश्रध्दांच्यामध्ये गुरफटली असल्याचे दिसते.

'घार' (कोंबारा)

या कथेमधूनही आपली सून म्हणजे घार आहे. अशी अंधश्रध्दा सासूच्या मनात असल्याचे जाणवते.

सूमीच्या मनात भीती असते. आपली सासू आपल्याला दागिने देणार नाही. या भीतीने तिच्या मागे लुडबूड करते तेव्हा सासू म्हणते -

उदा. - व्हय व्हय, माझं ध्यान झालं असल

त्या घारीला. म्हातारी कवा न्हायाला बसती

आन मी कवा झपाटा देऊन म्हातारीचा ऐवज पळवती!'

**४) प्राणीसृष्टी :-**

खेड्यातील माणसाच्या जवळ राहणारा त्याचा जीवाभावाची सोबती म्हणजे प्राणी-जनावरे होत. 'आंदण' व 'कोंबारा' या दोन्ही कथासंग्रहामधून असे प्राणी आल्याचे जाणवते.

'आंदण' (आंदण) या कथेमधून 'बाळी' गरीब शेतकऱ्याच्या घरी आंदण म्हणून येते ती घरातील एक घटक म्हणून सर्वजण तिच्याकडे पाहतात. या गायीवर जीवापाड प्रेम करणारे शेतकरी कुटुंब येते.

'नंदी बैल', 'गुबूगुबू' (आंदण) या कथेमधून येतो. तर शेतकऱ्याच्या शेतात राबून त्याची शेती पिकविणारा 'शेला' बैल येतो. (पैक्याची झाडं ), उमाजीबरोबर राबणारे गाढव येते (वझ्याखालचं वझं), दारातील झाडावर खोप्यात राहणारे कावळे येतात (खोपा), अचानक भिंतीवरून सरपटणारी पाल दिसते (पाल), अंधश्रध्देपोटी देवीच्यासमोर बळी दिला जाणारा रेडा दिसतो (रेडंजत्रा).

जसे 'आंदण' या कथासंग्रहामधून प्राणी येतात तसे 'कोंबारा' कथासंग्रहामधून येतात.

'रानबा' (कोंबारा) शेतकऱ्याच्या दावणीतील 'गवळी' गाय येते. आंब्याच्या झाडावर दंगा करून पाड पाडणारी माकडे (पाड) कथेत येतात. निवेदकाच्या जीवनात मातृतुल्य प्रेम करणारी लहानपणी त्याचा जीव वाचविणारी वनचाळी गाय येते (वनचाळी), सुमीच्या घरावर सतत फिरणारी घार दिसते. (घार).

ग्रामीण कृषिजीवनात शेतकऱ्याच्या जीवनाशी प्राणीजीवन कसे निगडित आहे याचा प्रत्यय दोन्ही कथासंग्रह अभ्यासत असताना येतो.

५) निसर्ग वर्णन :-

उत्तम तुपे यांच्या कथासंग्रहामधून निसर्ग वर्णन येते. 'फास'(कोंबारा) या कथेमधील वर्णन

उदा. कुचमत निघालेला सूर्य डोंगराच्या शिगेवर रेंगाळत होता.

भूत उठल्यागत सावल्या लांब होत होत्या.

**मुठीतलं माणिक - (कोंबारा)**

"उगवती लाल झाली हुती. अंधाराला हटकून आलेल्या उजेडाची चाहूल लागलेली पाखरं किलबिल करून निपचित पडलेल्या जगाला जागं करीत हुती"

**'कल्पना' (कोंबारा)**

"कडाक्याची उन्हं पडली होती. पाण्याचा प्रवाह पांगुळला होता. पाण्यावर टकुरं काढलेली शेवाळ पाण्याला खाली दाबून वर तरंगत होती.'

**'चूक कुणाची' (आंदण)**

"नियतिनं निसर्ग फुलवला हुता, फुलारलेली, बहरलेली सृष्टी हिरवाळली हुती. रंगाच्या अनेक तारा फुलांच्या-पानांच्या रुपानं उगवल्या हुत्या नि पाखरांचे सूर त्यावरनं उतरून टाकल्यागत उमटत हुते"

**'पाल' (आंदण)**

"भवरा फिरवल्यागत वारं फिरलं, झपाटयात धावलं त्याला हिस्कत, उधळत गरगरायला लागलं. भुईतून अवचित उगवल्यागत मातीच्या बुकन्याचा खांबच्या खांब उभा राइला"

**६) स्त्रीजीवन :-**

संसारातील, कुटुंबातील एकमेकांविषयी असणारी आस्था कणवेची आणि मायेची भावना या भावनेमुळे मनात निर्माण होणारे कल्होळ याचे चित्रण उत्तम बंडू तुपे करतात. लेखक दुःखाच्या कहाण्या वीणतात हे दुःख भोगणाऱ्या खेडूत स्त्रिया असल्या तरी त्यांच्या दुःखाची जात वेगळी असून दुःख खोलवरचं आहे. कथेतील सर्वच माणसे सामान्य आहेत, गरीब आहेत. एकमेकांच्या आधाराने जगू पाहणारी एकमेकांना सुख देणारी आहेत. अशा निवडक स्त्रीचे जीवन काही कथामधून येते.

'चिंबाडं' (आंदण) कथेमधून स्वतःच्या घरासाठी धडपडणारी 'मंजा' भेटते.

'चूक कुणाची' (आंदण) या कथेमधून कुटुंबातील सर्वांनी धारेवर धरले तरी त्रागा न करणारी शांत सुस्वभावी 'सपना' येते.

'जग' (आंदण) या कथेमधील देवदासी झाल्याने स्वतःच्या आयुष्याची होळी येलू करते. त्याबरोबरच मुलीचे जीवनही संपविते. अशी 'राधा' येते.

'फास' (कोंबारा) या कथेमधून बदफैली वर्तनाची नली भेटते. स्वतःच्या नवऱ्यावर निष्ठा ठेवणारी 'कल्पना' भेटते. ती जरी नवऱ्याबरोबर एकनिष्ठ असली तरी तिच्या आयुष्यात घोंगावणारे वादळ निर्माण होते. कथेमधून अशा स्त्री जीवनाचा प्रत्यय येतो.

'वणवा' (कोंबारा)कथेमधून आयुष्याचा वणवा झालेल्या 'सखू' चे जीवन चित्रण येते. 'वण' (कोंबारा) कथेमधून प्रियकराच्या विरहाने आर्त बनलेली विरहिनी 'मैना' येते.

'वाली' (कोंबारा) या कथेमधून नवरा आजारी असताना त्याची काळजी घेणारी वाली भेटते.

'गुतळा' (कोंबारा) या कथेमधून 'सगुणा' येते. कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रियेत झालेली चूक तिचे जीवन उद्ध्वस्त करते की काय असे या कथेमधून जाणवते.

सारांश :- ग्रामीणवास्तव, समूहजीवन अंधश्रध्दा प्राणीसृष्टी, निसर्ग वर्णनि, स्त्रीजीवन इत्यादी 'आंदण' व 'कोंबारा' या कथासंग्रहांची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

## संदर्भ

१) बांदिवडेकर, चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास',

पुणे, मेहता प्रकाशन,

तृ.आ.१९७३,

पृ.१२

२) तुपे, उत्तम बंडू, 'आंदण'

पुणे, चंद्रकला प्रकाशन, प्र.आ.१९८६,

पृ.१५

३) तत्रैव, 'पैक्याची झाडं',

पृ.३७

४) तत्रैव, 'खुळंबा',

पृ.१०७

५) तुपे, उत्तम बंडू 'कोंबारा',

पुणे, शशिदीप प्रकाशन, प्र.आ. १९९३,

'वैशाखी वारं'

पृ.११२

६) तत्रैव, 'रानबा',

पृ.१३

७) तत्रैव, 'सार्लिंग',

पृ.१५१

८) तुपे, उत्तम बंडू ,'आंदण',

'पाल',

पृ.७७

९) तत्रैव, 'पारंबी',

पृ.१११

१०) तुपे, उत्तम बंडू, 'कोंबारा',

'वण', पृ.६४

११) तुपे,उत्तम बंडू 'आंदण',

'शिसारी',

पृ.१२४

१२) तत्रैव, 'चिंबाडं',

पृ.३८

१३) तुपे,उत्तम बंडू, 'कोंबारा',

'रानबा',

पृ.११

१४) तत्रैव, 'फास',

पृ.१७

१५) तत्रैव, 'चळवळीची वळवळ',

पृ.४०

१६) तुपे,उत्तम बंडू ,'आंदण',

'पारंब्या',

पृ.११४

१७) तत्रैव, 'सवड',

पृ.१३२

१८) तुपे, उत्तम बंडू, 'कोंबारा',

'पाड', पृ.६५

१९) तत्रैव, 'घार',

पृ.९८

२०) तुपे,उत्तम बंडू, 'आंदण',

'गुबूगुबू'

पृ.२३

२१) तत्रैव, 'वझ्याखालचं वझं',

पृ.६६

२२) तुपे, उत्तम बंडू, 'कोंबारा',

'कोरडयास',

पृ.१४०

२३) तुपे, उत्तम बंडू , 'आंदण',

'पाल',

पृ.८८

२४) तत्रैव, 'जग',

पृ.१३०

२५) तत्रैव, 'रेडंजत्रा',

पृ.१४९

२६) बळेल, अनिल, 'वस्तीवरचा दादा होता होता कादंबरीकार झाला',

मुंबई,ललित मासिकातील लेख, एप्रिल १९८८,

पृ.७०

२७) यादव, आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या',

पृ.१०२

२८) गुंदेकर, श्रीराम, 'ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन',

दिलीपराज प्रकाशन, प्र.आ.१९९९,

पृ.९

२९) यादव, आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप समस्या',

पृ.८४

३०) तुपे, उत्तम बंडू 'आंदण',

'आंदण',

पृ.९

३१) तत्रैव, 'गुबूगुबू',

पृ.१६

३२) तुपे, उत्तम बंडू 'कोंबारा',

'गुळव्या',

पृ.११८

३३) तुपे उत्तम बंडू ,'आंदण',

'हुंडा',

पृ.५७

३४) तत्रैव, 'चूक कुणाची',

पृ.७५

३५) तत्रैव, 'खोपा',

पृ.९५

३६) तुपे, उत्तम बंडू, 'कोंबारा',

'कोंबारा',

पृ.९

३७) तत्रैव, 'वणवा',

पृ.५४

३८) तत्रैव, 'घडी',

पृ.१७१

३९) तत्रैव, 'झाड बोलतयं',

पृ.१६४

****

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR